# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ४०** **// स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त//** **दिनांक : १२/०१/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१२/०१/२०२१ मंगळवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | नेरकर सरिता अनंत |
| सोनवणे मुकुंदा भागवत | बाविस्कर किशोर रमेश |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील कुलभुषण विरभान |
| काळे रेश्मा कुंदन | बरडे नितीन मनोहर |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | नाईक प्रशांत सुरेश |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, नगरसचिव ,श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त,किरण देशमुख उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्या शेख सैईदा युसुफ यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा. सभापती महोदय यांनी मंजूर केलेला आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** मौजे जळगांव स.नं.३३७/३ब/१ ते ४ या जमिनिवरिल आरक्षण क्र.४ व ५ चे भुसंपादना विषयी जळगांव शहर महानगरपालिका, यांच्या वतीने मे.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद मध्ये याचिका दाखल करणे व याचिकेचे कामकाज मनपातर्फे पाहणे कामी ॲड.शैलेश पी.ब्रम्हे यांची नियुक्ती करणे व सदर कामी येणारा रक्कम रु.३ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सदर विषयावर मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद मध्ये जाण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करुन प्रथम आपल्या महानगरपालिका वकील पॅनलची यादी सभागृहात सादर करावी आणि आपल्या पॅनलवर असलेल्या वकीलांपैकीच नेमणुक व्हावी. आमच्या माहितीप्रमाणे सदरचे वकील आपल्या पॅनलवर नाही. आपण पॅनल व्यतिरीक्त वकीलांची नेमणुक केल्यास चुकीचे पायंडा पडेल व सभागृहाने मान्यता दिलेल्या पॅनलला काहीच अर्थ राहणार नाही. सभागृहाचा अवमान होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी . आपल्या महापालिकेच्या पॅनलवर जे वकील आहे पॅनलचे तेच ठेवण्यात यावे. कारण पॅनलवर तो वकील नाही ज्याच नांव सुचविलेल आहे.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ मला वाटत मागे, पॅनलवरच हा प्रश्न हायकोर्टापर्यंत गेलेला होता. आणि पॅनलवरच्या वकीलांनी सदरची केस चालविलेली आहे. आणि सदरच्या जमिनीचा मोबदला संबंधीत शेतकऱ्याला पुर्ण दिलेला असतांना सुध्दा फक्त त्या जमिनीत असलेली विहीर तिच मुल्यांकन बाकी होत. जिल्हाधिकाऱ्यांकडुन त्या विहीरीच मुल्यांकन बाकी होत. आणि सर्व मोबदला दिला असतांना फक्त आपल्याला मला वाटत, ७/१२ च्या उताऱ्यावर सुध्दा महापालिकेच नाव लागलेल असतांना सुध्दा आपल्या पॅनलवरच्या वकीलांच्या दुर्लक्षपणामुळे आपल्या महापालिका विरोधात निर्णय गेलेला आहे. आणि आपल्याला संबंधीत शेतकऱ्याला १२ कोटी देण्याचे आदेश झालेले आहे. १५.५ कोटी देण्याचे आदेश झालेले आहे. त्यासाठी आपण सर्व सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. हे जे श्री.ब्रम्हे वकील आहे त्यांना लावायला पाहिजे. आणि आपले १२ कोटी कसे वाचविता येईल. त्याच्यासाठी आपल्याला हा प्रयत्न करायचा आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मला प्रशासनाचा जो प्रस्ताव आलेला आहे, आपले जे पॅनल आहे वकीलांच, त्या पॅनलमधुन का वकील घेण्यात येऊ नये. आमच हे म्हणण आहे. प्रशासनाने त्याच्यावर खुलासा करावा.

**मा.आयुक्त :-** महानगरपालिकेची बाजु न्यायालयामध्ये व्यवस्थीतपणे मांडता यावी आणि महापालिकेच्या हिताचे रक्षण व्हावे. याच्या दृष्टीने योग्य निर्णय आपण घेतला पाहिजे. आता कोणता निर्णय योग्य आहे कोणता निर्णय अयोग्य हे त्या परिस्थितीवर अवलंबुन आहे. आपण सर्वसामान्यपणे जस सर्व सन्मा.सदस्य म्हणत आहे त्याप्रमाणे आपण आपल्या पॅनलवरचेच वकील नेमु. अश्या वेळेला अशा प्रकारणामध्ये आपल्याला पॅनलच्या बाहेरचे वकील नेमण्याची का गरज पडली. तिची जर थोडी जर पार्श्वभुमी आपण समजुन घेतली. तर मला वाटत आपल्याला याच्यावर योग्य निर्णय घेणे शक्य होईल.आताच सुरुवातीला सन्मा.अध्यक्ष महोदय हे क्लियर करतो की, स्थायी समितीला जर हे वकील योग्य वाटत नसतील. स्थायी समिती समोर हा विषय निर्णयासाठी आलेला आहे. सर्व सन्मा.सदस्यांना या प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्याची आपल्याला मुभा आहे. प्रशासनाचा प्रस्ताव आपण मान्यच करावा अश्या प्रकारचं बंधन आपल्यावर कायद्याने निश्चित नाही. प्रस्ताव आहे आपल्याला योग्य वाटला आपण स्विकारावा अयोग्य वाटला तर नामंजुर ही करु शकतो. परंतु निर्णय घेत असतांना त्याची पार्श्वभुमी आणि आपण घेत असलेल्या निर्णयाचे भविष्यामध्ये होणारे परिणाम या दोन्हींचा विचार करणे गरजेचे आहे. केवळ प्रशासन येस म्हणत असेल तर आपण नो म्हणायच आणि प्रशासन नो म्हणत असेल तर आपण येस म्हणायच. नेमक अश्या प्रकारची भुमिका घेऊन महानगरपालिकेच हित साधल जाणार आहे का ? तो आपण विचार केला पाहिजे. प्रशासनावर अविश्वास दाखवायला हरकत नाही. परंतु महानगरपालिकेच्या हिताचे रक्षण आपण त्याच्य बरोबरीने केला पाहिजे. ज्या ठिकाणी आपल्याला अस वाटत की, प्रशासनाच्या प्रस्तावाला सुध्दा आपण महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने वेगळा निर्णय घेऊ शकतो. त्यावेळेला आपण वेगळा निर्णय घेणे हे केव्हाही योग्य आहे. आता जर या प्रकरणाची पार्श्वभुमिची बाजु जर आपण विचारात घेतली. तर जस मा.सभापती महोदयांनी सांगितल. आपण सन १९९५ मध्ये त्या वेळेला नगरपालिकेने आरक्षण क्र.४ सिव्हीक सेंटर सर्व्हे नं. ३३७ ब, ती आरक्षणाची जागा नगरपालिकेने घरकुल योजनेसाठी संपादित करायच ठरवलं. जागेचे मालक श्री.कोल्हे आणि इतर सगळे जण, माझ्या माहिती प्रमाणे ४ मालक त्या जागेचे होते. काही त्रृटया असेल तर तुम्ही मला दुरुस्त करा. त्या ४ मालकांशी तत्कालीन नगरपालिकेच्या अध्यक्षांनी, मुख्याधिकाऱ्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी सर्वानुमते चर्चा केली आणि चर्चेमध्ये साधारणपणे ३ लाख रुपये प्रति एकर अश्या पध्दतीचा त्या वेळेला मुआवजा अदा केला. आणि दोघांनी एकमेकाच्या संमतीने खाजगी वाटघाटीने ही जागा महानगरपालिकेने खरेदी करण्याचा निर्णय घेतला. तश्या पध्दतीचे संपुर्ण कागदपत्र तत्कालीन नगरपालिकेच्या जनरल बॉडीचा ठराव, दराला मान्यता अश्या प्रकारची सर्व कागदपत्र आपल्याकडे आहे. हा जो दर ठरला त्या दराप्रमाणे महापालिकेन प्रत्येक जे तेथील टेंडर धारक आहेत. तिघ जणांची ३७ आर. आणि एकाजणाची ३६ आर अशी जमीन आहे त्याच्यामध्ये. आणि यांना मी जे आता सांगितल त्या दराप्रमाणे जी काही किंमत आहे ती रक्कम नगरपालिकेने त्या वेळेला अदा केली. अदा केल्यानंतर त्याच्याकडुन रितसर कुठल्याही आक्षेपा विना स्वखुशीने महानगरपालिकेने पोझेशन रिस्विड करुन ताब्याची पावती घेतली. रक्कम वाटाघाटीने ठरली आपण रक्कम त्याला अदा केली. ती रक्कम जागा मालकाने स्विकारली. महानगरपालिकेला जागेचा ताबा दिला. आपण त्या ठिकाणी घरकुल बांधुन वाटप केल, आज ती जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. आणि जे घरकुल धारक आहे ते जागेचा वापर करत आहे. दरम्यानच्या काळामध्ये मा.सभापतींनी सांगितल्याप्रमाणे त्या जागेवर एक विहीर होती. आणि विहीरीच मुल्यांकन किती कराव याच्याबाबतीत त्यावेळेला निर्णय असा घेतला महानगरपालिकेने की, या विहीरीच मुल्यांकन शासनाकडुन करुन घ्याव. आणि जे काही शासन त्याच मुल्यांकन करेल. त्याप्रमाणे त्याची रक्कम आपण अदा करायची. या मुल्यांकनासाठी आपण महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला आपण पत्र दिल. त्यांच्याकडुन त्याच मुल्यांकन काही झाल नाही. आणि कागदपत्र आपण जर बघितले तर अस लक्षात येत की, त्या वेळेच्या नगरपालिकेच्या नगरअभियंत्यांनी त्याच मुल्यांकन केल. काही तरी ७०-७२ हजाराच त्याच मुल्यांकन झाल .परंतु ही रक्कम काही, पुढ त्याच्यावर काही कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. एक महत्वाची त्याच्यामध्ये बाब नगरपालिकेकडुन त्याच्यामध्ये राहुन गेली. आपण मान्य केल पाहिजे की, खाजगी वाटाघाटीने का असे ना ती आपण खाजगी मालकाकडुन खरेदी करतो. त्याच रितसर खरेदी खत हे करुन घेण गरजेच होत. परंतु त्यावेळेला अशी काही कृती झालेली नाही. मात्र मा.सभापतीने आता सांगितल्याप्रमाणे आपली त्याच्यावरती नावाची नोंद झाली. त्यानंतर मुळजागा मालकाला काही त्याला सल्ला मिळाला असेल त्याप्रमाणे त्यानी ऑब्जेक्शन घेतल आणि की, पुन्हा त्याची नोंद की महापालिकेच्या संमतीने ती जागा कमी आहे. आता

महानगरपालिकेच्या ताब्यात ती जागा आहे, महानगरपालिका ती वापरत आहे. घरकुल बांधली गेली. नंतर याच्या मध्ये त्या जागा मालकाने उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केला की, ही जागा महानगरपालिकेने भुसंपादन न करता ताब्यात घेतलेली आहे. या जागेच भुसंपादन कायद्याप्रमाणे भुसंपादन झाल पाहिजे. आता त्याच्यामध्ये महानगरपालिकेने उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे त्या ठिकाणी ती सेफसाईड होती आपली बाजु मांडली. परंतु या सगळया प्रक्रियेमध्ये महानगरपालिकेंचे जे काही वकील नेमलेले होते. त्यांच्याकडुन उच्च न्यायालयामध्ये अस स्टेटमेंट करण्यात आल की, आम्ही या जागेची भुसंपादन करायला तयार आहोत.वास्तविक पाहता ती जागा आपण खाजगी वाटाघाटीने संपादीत केलेली आहे. त्याची पुन्हा भुसंपादन कायद्याप्रमाणे भुसंपादीत करण्याची आवश्यकता राहत नाही. कायद्याने आपल्याला दोन प्रकारे भुसंपादीत करण्याचे अधिकार दिलेले आहे.एक खाजगी वाटाघाटीने म्हणजे जमिन मालकाशी आपण चर्चा करायची जसे दोन खाजगी लोकं एकमेकांशी जमिनीच व्यवहार करतात. त्यापध्दतीने दोघांना मान्य असेल अशी किंमत लावायची. आणि त्याप्रमाणे रक्कम अदा करुन त्या जागेची आपण खरेदी करायची. आता कुठलीही खरेदी खाजगी असो किंवा महानगरपालिकेमार्फत असु द्या. त्याची खरेदी व्हायला पाहिजे आणि अर्थात रजिष्टरी झाली पाहिजे. जो पर्यंत रजिष्टरी होत नाही तो पर्यंत व्यवहार हा कायदेशीर समजला जात नाही. दुसरी एखादा जागा मालक आता रोखीने खरेदी करत असतांना पुन्हा आपल्याला टाऊन प्लॅनिंग मध्ये त्याच जागेवर त्याला आपण एफ.एस.आय. देतो. किंवा त्या जागेवर एफ.एस.आय.नसेल तर टी.डी.आर. देतो. म्हणजे टि.डी.आर., एफ.एस.आय किंवा रोख मोबदला असे तिन्हीही स्वरुपात आपण मोबदला देऊन आपण खाजगी कार्यवाही करु शकतो. किंवा एखादा जागा मालक जर आपल्याला स्वखुशीने जागा ताब्यात द्यायला तयार नसेल तर त्याच्यासाठी आपल्याला कंम्पलसरी ॲक्वीसीएशन करावा लागतो. आणि आता जे भुसंपादन जे आपल्याला करायच आहे. त्यासाठी भुसंपादन कायद्याप्रमाणे आपण आपला प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवितो आणि जिल्हाधिकारी महानगरपालिकेच्या वतीने भुसंपादन कायद्याच्या तरतुदीप्रमाणे याच भुसंपादन करुन आपल्याला ती जागा देतात. आपण भुसंपादनाची जी काही रक्कम असेल ती जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संबंधीत जमिन मालकाला अदा करतो. ही झाली आपली कार्यपध्दती, याला अनुसरुन ज्या वेळेला उच्च न्यायालयामध्ये ज्यावेळेला हा विषय आला त्यावेळेला उच्च न्यायालयाच्या विचारण्या वरुन किंवा अर्जदाराच्या मागणी वरुन महानगरपालिकेने ती जागा भुसंपादीत कायद्याखाली भुसंपादीत करु. अश्या प्रकारच स्टेटमेंट दिल आणि अर्जदाराची मागणीच ती होती की, आमची भुसंपादनाच्या खाली तुम्ही भुसंपादन करा. आता ही घटना आहे २०१३ चा नविन कायदा येण्याच्यापुर्वी. माझ्या माहितीप्रमाणे २०११ किंवा २०१२ मध्ये तो पहिला दावा दाखल झाला आहे. सॉरी २००८ मध्ये. आता हा दावा दाखल झाल्यानंतर महानगरपालिकेला उच्च न्यायालयामध्ये कमिटमेंट दिली की, आम्ही या भुसंपादन कायद्याप्रमाणे आम्ही या जागेच भुसंपादन करु . पण तरी सुध्दा महानगरपालिकेने हा भुसंपादनाचा प्रस्ताव पाठविलेला नव्हता. त्यामुळे जागा मालक हा महानगरपालिकेच्या विरोधात पुन्हा उच्च न्यायालयामध्ये गेले. Contemned Petition दाखल केल. Contemned Petition दाखल केल्यानंतर न्यायालयाने आदेश दिले की, तुम्ही विहीत मुदतीमध्ये याचा भुसंपादनाचा प्रस्ताव पाठवावा. हा भुसंपादनाचा प्रस्ताव पाठविण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश झाला. सर्वोच्च न्यायालयामध्ये पण त्यावेळेला आपण याचिका दाखल केली.परंतु ही याचिका ५९४ दिवस उशिरा किती.

**श्री.शकील शेख, रचना सहाय्यक :-** ५९२ दिवस

**मा.आयुक्त :-** ५९२ दिवस उशिरा महानगरपालिकेने दाखल केली. त्यामुळे उच्च न्यायालयाने ही याचिका दाखल करून घ्यायला नकार दिला. ५९२ दिवस म्हणजे जवळपास पावणेदोन वर्षाचा विलंब केला. ऐवढा विलंब लागण्याच काही कारण नाही. त्यामुळे महानगरपालिकेची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळुन लावली. आता आपल्याला महासभेची मान्यता घेऊन हा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे भुसंपादनासाठी द्यावा लागला. आता भुसंपादनासाठी प्रस्ताव दिल्यानंतर सुध्दा ती प्रक्रिया बऱ्याच काळ चालु राहिली. ज्या प्रक्रियेला विलंब होत आहे म्हटल्यानंतर दरम्यानच्या काळामध्ये २०१३ चा केंद्र सरकारचा हा नविन भुसंपादन कायदा आला. ज्याच्यामध्ये मोबदल्याची रक्कम पुर्वीच्या कायद्याच्या तुलनेमध्ये पुर्वीची दिलासा रक्कम ३०% दिली जायची. ती दिलास्याची रक्कम संसदेमध्ये मंजुर केलेल्या कायद्याप्रमाणे राहिल. म्हणजे बोलीभाषा मध्ये जो दुप्पट मोबदला जे म्हणतो, ते दुप्पट मोबदल्याचा कायदा २०१३ मध्ये आला. आणि तो संपुर्ण देशभर लागु झाला. जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन, महानगरपालिकेकडुन ही सर्व भुसंपादन प्रक्रियेला होत असलेला विलंब

विचारात घेऊन याच्यामध्ये जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका या दोघांच्या विरोधामध्ये मुळ जमिन मालकाने दुसरा Contemned Petition दाखल केला. त्या दुसऱ्या Contemned Petition मध्ये न्यायालयाने आदेश दिले की, एक वर्षाच्या मुदतीमध्ये तुम्ही त्याचा अवार्ड केला पाहिजे. हे आदेश दिल्यानंतर शासनाने याच्या संदर्भामध्ये अर्थातच एक अवार्ड होण्यासाठी जी काही प्राथमिक रक्कम होते ती जिल्हाधिकाऱ्याच्या मागणी प्रमाणे आपण ७.५ कोटीच्या दरम्यान आहे. एवढी रक्कम आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे भरणा करण्याबद्दल आपल्याला आदेश दिले. ही ७.५ कोटीची रक्कम त्या वेळेला आपल्याला भरणा करायची होती. त्यावेळेला आपण महासभेसमोर हा विषय ठेवला. महासभेने त्याच्यामध्ये खुप तपशीलवार अभ्यास करून आपला निर्णय घेतला की, याच्यामध्ये वेळोवेळीला महानगरपालिकेकडुन न्यायालयामध्ये बाजु मांडत असतांना त्रृटी राहिलेल्या आहेत. त्यामुळे आता ही रक्कम भरणे महापालिकेच्या हिताने निश्चित योग्य होणार नाही. आणि त्याच्यासाठी तिघ जणांची आम्ही समिती नेमली. त्या समितीमार्फत याच्यामध्ये आपल्याला पुन्हा याच्यामध्ये न्यायालयाकडे दाद वगैरे मागता येईल का? त्याचा अभ्यास करा अश्या प्रकारचा तो निर्णय झाला. पण उच्च न्यायालयाने दुसऱ्या Contemned Petition मध्ये महानगरपालिकेस शासनाने दिलेल्या आदेश की, एक वर्षामध्ये अवार्ड डिक्लेअर केला पाहिजे. याला अनुसरु न तत्कालीन आयुक्तांनी हा महासभेचा ठराव शासनाकडे कलम ४५१ खाली पाठविला की, याची अंमलबजाणी करणे उच्च न्यायालयाच्या आदेशाला अनुसरु न होणार नाही. आणि शासनाने अर्थातच उच्च न्यायालयाचा आदेश विचारात घेऊन न्यायालयाचा अवमान होऊ नये. या दृष्टीने महापालिकेचा हा शासनाने ठराव रद्द केला. आणि आयुक्ताला उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही .याची आवयश्यक ती खबरदारी घेण्याची सुचना दिली. याप्रमाणे ७.५ कोटीची रक्कम आपण जिल्हाधिकारीकडे भरली. आता ही तपशीलवार परिस्थिती असे दर्शवते की, न्यायालयामध्ये आपण ज्या ज्या वेळेस याच्या संदर्भात बाजु मांडली. त्यावेळेला न्यायालयात आपल्या बाजुने काही निर्णय झाला नाही. आपण सर्वोच्च न्यायालयात ही गेलो परंतु विलंबाच्या कारणावरून ही याचिका उच्च न्यायालयाने रद्द केली होती. सर्वोच्च न्यायालयाने. आता हे सगळ झाल्यानंतर आपण रक्कम भरली, आता त्याच्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी याच्या बद्दलचा अहवाल जानेवारी २०२० मध्ये बरोबर आहे.

**श्री.शकील शेख, रचना सहाय्यक :-** दि.२०/०१/२०२० मध्ये.

**मा.आयुक्त :-** २० जानेवारी २०२० ला त्याच अमाऊंट डिक्लेअर केल की, अवार्डची रक्कम किती भरायची सांगा. ज्या रक्कमेची आज जिल्हाधिकारी आपल्याला मागणी करत आहे. याच्यामध्ये जागा मालकाला द्यायची असलेली रक्कम आणि शासनाचा होणारा जो काही अस्थापनेचा खर्च या सगळयासह ती रक्कम १५ कोटी आणि म्हणजे साधारणत:

**श्री.शकील शेख, रचना सहाय्यक :-** १४ कोटी ७४ लाख.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे बघा वाढीव मागणी आलेली आहे का ? प्रशासकीय मागणी म्हणुन काही फायनल पत्र दिलेल आहे का बघा. ठिक आहे १४.५ ते १५.५ कोटीच्या दरम्यानमधील ती रक्कम आहे. एक्झ्याक्ट बघुन मला सांगा. आता १००% ही रक्कम आपल्याला जिल्हाधिकाऱ्यांकडे भरली पाहिजे. दरम्यानच्या काळामध्ये जी काही आदेश झालेले होते. ही एक महिन्याच्या मुदतीमध्ये, एक वर्षाच्या मुदतीमध्ये याचा निर्वाळा जिल्हाधिकाऱ्यांनी जाहिर करावा. त्यावेळेला महापालिकेच्या आयुक्तांना मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी असे आदेश दिले होते की, याच्यामध्ये आम्ही महानगरपालिका आयुक्तांना असे आदेश देत आहोत. कि हे अवार्ड त्यांच्या इंग्लिश भाषेमध्ये it is too later and spirit. म्हणजे त्याची भावना आणि त्या प्रतिचा अर्थ लक्षात घेऊन तुम्ही एक अवार्ड पुर्णत्वाला जाईल. या दृष्टीने आवश्यक ती सर्व बाबी ही महापालिका आयुक्तांनी घ्यायची आहे. आता एखादा अवार्ड डिक्लेअर झाल्यानंतर ते पुर्णत्वाला जाणे याचा अर्थ भुसंपादन करणारे संस्थेमध्ये आपल्या महानगरपालिकेने १००% रक्कम शासनाकडे म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे भरायची आणि भरल्यानंतर ती रक्कम संबंधित मालकाला जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने ती रक्कम अदा केली जाते. आणि जर ताबा घेतला नसेल तर तिचा ताबा जिल्हाधिकारी आपल्याला देतात. नसेल तर त्या अवार्डच्या आधारे आपण आपल नाव रेकॉर्डला लावु शकतो. म्हणजे एखादा अवार्ड पुर्णत्वाला येणे याची ही प्रक्रिया आहे. आता ही प्रक्रिया तुम्ही ताबडतोब पुर्ण केली पाहिजे. अश्या पध्दतीचे आदेश हे उच्च न्यायालयाने त्याच्यामध्ये दिलेले होते. म्हणजे आयुक्तांवरती अवार्ड डिक्लेअर केल्यानंतर ती जी काही रक्कम आहे ती भरणे महानगरपालिकेच्या वतीने हे उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे बंधनकारक होत. जानेवारी मध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडुन हा अवार्ड पास झाला. ह्या अवार्डला विभागीय आयुक्तांची मान्यता आहे. हे अवार्ड

डिक्लेअर झाल्यानंतर रक्कम भरण्याबद्दल जेव्हा जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्याला कळविल. त्यावेळेला आपल्याकडील हा आयुक्त पदाचा चार्ज हा ही जिल्हाधिकाऱ्यांकडेच होता.त्यामुळे याच्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय असा घेतला की, आपण ही रक्कम न जमा करता त्याच्यामध्ये काही सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश आहेत. आणि आपले काही आक्षेप आहे. ते आक्षेप विचारात घेऊन आपण हे अवार्ड नविन कायद्याखाली एक ट्रॅब्युनल स्थापन झालेल आहे न्यायाधिकरण ते नागपुरला आहे. नागपुरच्या न्यायाधिकरणाकडे आपण याच अपील दाखल कराव. त्याप्रमाणे आपण नागपुर न्यायाधिकरणामध्ये मार्च २०२० मध्ये आपल प्रकरण आपण जिल्हाधिकारी जळगांव यांच्यामार्फत पाठविलेल आहे.आपण जिल्हाधिकारीकडे पाठवितो. जिल्हाधिकाऱ्यांनी ते नागपुर न्यायाधिकरणाकडे पाठविलेले आहे. सद्या हे प्रकरण नागपुरच्या न्यायाधिकरणाकडे प्रलंबित आहे. दरम्यानच्या काळामध्ये अश्या ज्या काही अवार्डच्या प्रकरणांच्या बाबतीमध्ये न्यायाधिकरणाकडे आपली एक केस दाखल होती. त्याच्या मध्ये नागपुर न्यायाधिकरणाने असा निर्णय दिला की, नविन झालेल्या कायद्याप्रमाणे भुसंपादन करणाऱ्या संस्थेला जो जिल्हाधिकारी किंवा शासन निवाडा देत असतो. तो निवाडा चॅलेंज करण्याचे तुम्हाला अधिकार नाहीत. याच्यामध्ये तुम्हाला फक्त निवाडयाची रक्कम वाढवुन मागण्यासाठी जमिन मालकाला अपिल करण्याची तरतुद आहे. भुसंपादन करणाऱ्या संस्थेला अवार्ड चॅलेंज करणे किंवा अवॉर्डची रक्कम कमी करु न मागणे असा अधिकार नाही. अश्या प्रकारचा नागपुर न्यायाधिकरणाने निर्णय दिला. आता आगोदरच्या प्रकरणात दिलेला निर्णय जर आपण विचारात घेतला, या भुसंपादन प्रकरणात सुध्दा काही वेगळा निर्णय होईल अशी शक्यता नाही. तरी सुध्दा अद्यापपर्यंत कोरोना असल्यामुळे आतापर्यंत ती केस काही आलेली नाही.मागच्या केसचा झालेला निकाल विचारात घेता, आपल्याला या केस मध्ये आपल्याला न्यायालयाकडुन वेगळा काही आदेश मिळेल अशी शक्यता नसल्याचे आपले मुख्यवकिल या न्यायालयात हजर झालेले आहे. आपले मुख्य विधी सल्लागार ॲड.श्री.मुजूमदार त्यांच्या मान्यतेने. आता ही रक्कम आपण भरत नाहीये. तर न्यायालय प्रधिकरणात आपण ती रक्कम भरत नाही.आपण नागपुर न्यायाधिकरणाकडे चॅलेंज करतो.आणि उच्च न्यायालयाने जे दिलेले आदेश आहे की, हे ॲडव्हान्सच प्रकरण हे तुम्ही विहीत मुदतीमध्ये योग्य अर्थाने पुर्णत्वाला नेल पाहिजे. या आदेशाच पालन शासन, जिल्हाधिकारी आणि महापालिकेचे अधिकारी करत नाही. म्हणुन या जमिन मालकानी, शासनातर्फे नगरविकास खात्याचे प्रधानसचिव, भुसंपादन अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी आणि ज्याच्या वतीने जो भुसंपादन करत आहे महानगरपालिका त्याच्यावतीने आयुक्त, असे तिघांच्यावरती याच्या मध्ये तिसरी अवमान घेतलेली आहे, औरंगाबादचे न्यायालयामध्ये मार्च मध्ये दाखल केली की, अवार्ड डिक्लेअर झालेला आहे पण अवार्ड पुर्णत्वाला जात नाही. महानगरपालिका रक्कम भरत नाही आणि जिल्हाधिकारी आम्हाला रक्कम देत नाही. या सगळी प्रक्रिया शासनाच्या वतीने चालु आहे. तर शासनाच्या नगरविकास खात्याच्या प्रधानसचिव, जिल्हाधिकारी आणि आयुक्त या तिघांविरुध्द ही अवमान याचिका दाखल झाली. जोपर्यंत कोरोना चालु होता तोपर्यंत ही अवमान याचिका काही आलेली नव्हती. दरम्यानच्या काळामध्ये डिसेंबरमध्ये आपल्याला तिथले जे ए.जी.पी. आहे. Assistant Government Pleader औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये त्यांनी एक मेल शासनाला आणि जिल्हाधिकाऱ्यांला पाठविला. ज्याच्यामध्ये न्यायालयाने असे आदेश दिलेले आहे. न्यायालयाने असे ही आदेश दिलेले आहे की, संबंधीत तिघही अधिकाऱ्यांना याच्या बाबतीत नोटीस काढावी. आणि तिन आठवडयाच्या आत पुढची कार्यवाही करावी. कोर्टाच्या भाषेमध्ये Recognizable in Three days म्हणजे तिन आठवडयानंतर ही केस बोर्डापुढे ठेवावी. त्याप्रमाणे ४ जानेवारीला ही केस बोर्डापुढे येणे, उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे येणे अपेक्षित होती. आता या सगळे आदेश आणि न्यायालयामध्ये दाखल झालेली नोटीस काढा असे प्रकारच्या दिलेले सुचनेप्रमाणे जवळपास आपल्याला याच्यामध्ये ७ ते ८ वेळेला जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन रिमाईंडर आलेले आहेत. उर्वरीत रक्कम तुम्ही तातडीने भरा. जर न्यायालयाचा अवमान झाला तर त्याची जबाबदारी आमच्यावर राहणार नाही, महापालिका आयुक्त यांची जबाबदारी राहील. आता आपल्यापुढे उच्च न्यायालयाचे वेळोवेळी झालेले आदेश, सर्वोच्च न्यायालयामध्ये आपल्याकडुन झालेला निकाल आणि आपल्याविरुध्द दाखल झालेले ३ कन्टेमंट पिटीशन, उरलेल्या दोन्हीमध्ये तर आपल्या विरोधात निर्णय झाले तिसऱ्याच्या बाबतीमध्ये आपण रक्कम भरणे गरजेचे आहे. याच्यासाठी आपल्याला रक्कम भरणे शिवाय दुसरा काही पर्याय दिसत नाही. तरी परंतु आपण आपल्या विधी सल्लागाराच्या मदतीने की, पुन्हा आपल्याला एकदा उच्च न्यायालयासमोर आपल्याला जाता येईल का ? जेणे करु न मागे ७.५ कोटी वगळता आता आपल्याला ७.५ ते ८ कोटी रु पये भरावे लागणार आहे. हे तरी रक्कम आपल्याला महापालिकेच्या

वतीने वाचवता येईल का ? याच्यामध्ये आपण एक लक्षात घेतल पाहिजे की, या जमिन मालकाला नगरपालिकेने खाजगी वाटाघाटी प्रमाणे ठरलेली रक्कम दिलेली आहे. ताबा आपल्याकडे झालेला आहे. ताबा पावती व खरेदी पावती झालेली आहे. महापालिकेच्या नावे ती जागा झालेली आहे.खरेदीखत झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणुन काही रक्कम महानगरपालिकेने दिलेली नाही किंवा बळजबरीने त्या जागेचा ताबा घेतलेला आहे अस तर म्हणता येणार नाही. ताबा पावतीवर जागा मालकाच्या सह्या आहेत. खालती मुख्याधिकाऱ्यांच्या सह्या आहे. आता या पार्श्वभुमीवर महानगरपालिकेच्या हिताच रक्षण करण्याच्या दृष्टीने आपल्याला काही प्रयत्न करता येईल का म्हणुन महानगरपालिकेच्या पॅनलवरचे जे वकील आहे आपले मुख्य विधी सल्लागार ॲड.श्री.मुजुमदार तसेच पॅनलवरचे दुसरे वकील ॲड.श्री.सुशिल त्रिपाठी आम्ही यांच्याशी टाऊन प्लॉनिंगच्या अभियंत्यांनी चर्चा केली. आणि याच्यामध्ये अजुन काही मार्ग निघेल का कायदेशिर, कि पुन्हा आपल्याला एकदा उच्च न्यायालयासमोर जाता येईल का ? पुर्वी जरी सर्वोच्च न्यायालयाने नाकारलेल असल तरी सुध्दा अजुन एकदा आपल्याला न्यायालयासमोर जाऊन आपली बाजु मांडण्याचा अधिकार मिळेल का ? जेणे करून आपल्याला अजुनही महानगरपालिकेचे पैसे वाचविता येईल या दृष्टीने आम्ही चर्चा करु त्याच्यामध्ये, औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्याच्या दृष्टीने आपण प्राथमिक चर्चा केली. त्याच्यामध्ये आपले या दोघही वकीलांच्या म्हणण्यात एक आले की, आता पर्यंतचे आपल्या सगळे उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयामधील आपले याचिका आपल्या विरोधात गेलेले आहे. हा तिसरा कन्टेम ट झालेला आहे. तिन तिन वेळा जर एखाद्या प्रकरणामध्ये कन्टेमट ऑफ कोर्ट होत असेल कदाचित हायकोर्ट सुध्दा याच्याबाबतीमध्ये जाणुनबुजुन ही महानगरपालिका उच्च न्यायालयाच्या आदेशाचा पालन करत नाही का? अश्या प्रकारचा जर घडत आल. तर मा.उच्च न्यायालय आपल्या विरुध्द कोणताही आदेश पारीत करु शकेल. अश्या वेळेला आपण कोणता तरी सिनियर वकील त्या ठिकाणी दिला पाहिजे की, या सगळया आता पर्यंत झालेल्या न्यायालयाच्या निर्णयांचा विचार करून पुन्हा हीच बाजु समर्थपणे उच्च न्यायालयासमोर मांडु शकेल. जेणे करुन पुर्वी झालेल्या निकालाशी प्रभावित न होता. आपल्या या सर्व बाजुंचा उच्च न्यायालय विचार करेल. आणि आपली बाजु जर विचारात घेतली, तर कदाचित आपल्याला याच्यामध्ये पुन्हा एकदा न्याय मिळण्याची शक्यता आहे. अश्या वेळेला आपल्या पॅनलवर असलेल्या वकीलांशी चर्चेमधुन सिनियर कॉन्सील कोणीतरी दिला पाहिजे. आपल्या पॅनलवरचे रूटीन मॅटर्स मधले जे वकील आहे. त्यांच्या ऐवजी जर जेष्ठ वकील, सिनियर कॉन्सील जर आपण त्याच्यामध्ये दिले. तर कदाचित आपली बाजु चांगल्यापैकी न्यायालयासमोर मांडली जाते. सिनियर कॉन्सील अर्थातच जे सिरीयस प्रकरणे आहे मोठी प्रकरणे आहे अश्या प्रकरणामध्येच सिनियर कॉन्सील दिला जातो. त्यामुळे या प्रकरणामध्ये सुध्दा आपण आपल्या पॅनलच्या बाहेर जाऊन का असे ना.जवळपास जर आपली १५.५ कोटीची रक्कम आपल्याला वाचवायची असेल तर आपण याच्यामध्ये सिनियर कॉन्सील देऊ या. आणि सिनियर कॉन्सील मार्फत जर आपण ती बाजु उच्च न्यायालयासमोर मांडली, तर कदाचित आपल्याला ही संधी मिळु शकते. आता न्यायालय काय निर्णय घेईल याच आज कोणीही प्रेडीक्ट करु शकत नाही. परंतु एकदा हा शेवटचा प्रयत्न आपल्याला करणे आवश्यक आहे. ज्या दृष्टीने वकीलांच्या चर्चेमधुन औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये प्रॅक्टीस करणारे ज्यांच नाव यांनी आता घेतलेल आहे. ॲड.श्री.सुशिल ब्रम्हे यांच नांव आपले वकीलांच्या चर्चेतुन सुचविण्यात आल.हे वकील अतिश्य सिनियर आहे. जी उपलब्ध माहिती ॲड.श्री.सुशिल त्रिपाठी साहेबांनी दिली. त्याच्यानुसार त्यांच नांव उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती म्हणुन नियुक्ती व्हावी. अश्या प्रकारची शिफारस आपल्या महाराष्ट्राच्या उच्च न्यायालयाकडुन मा.सर्वोच्च न्यायालयाने केलेली आहे. एवढे हे सिनियर विधीतज्ञ आहे, सिनियर कॉन्सील आहेत. यांच्याशी चर्चा करून जर त्यांना काही या केसवर काही तथ्य वाटल की, आपण काही बाजु मांडु शकतो का ? या दृष्टीने प्रयत्न करण्याच ठरल.म्हणुन आम्ही या दोघी वकीलांना घेऊन मी स्वत: औरंगाबाद मध्ये काम करणारे हे श्री.ब्रम्हे वकील यांच्याशी औरंगाबादला जाऊन मी चर्चा केली. त्यांना आगोदर ही सर्व कागदपत्र ॲड.सुशिल त्रिपाठींनी दिली. पुर्वी झालेल्या उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयाचे निकाल, सगळी कागदपत्रांचा त्यांनी स्टडी केला. आणि त्यांनी दिलेल्या वेळेला जाऊन आम्ही त्यांच्याशी चर्चा केली. आणि चर्चेमध्ये त्यांच अस म्हणण आल की, ही जर पुर्वीची स्थिती आहे तर कदाचित आपली बाजु व्यवस्थीत मांडली गेलेली नाही. ती बाजु आता आपल्याला मांडता येऊ शकते. कारण त्या वेळेला भुसंपादन आपण करु अश्या प्रकारची कमिटमेंट महानगरपालिकेने केलेली होती. त्यामुळे तुम्हाला भुसंपादन करणे गरजेचे आहे. भुसंपादन करायचे म्हटल्यानंतर जी काही त्याना येणारी अपेक्षित रक्कम आहे. त्याची निम्मी रक्कम भरण्याशिवाय ते भुसंपादन चालु होत नाही.

त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणेसाठी तुम्हाला जिल्हाधिकारीकडे निम्म्य रक्कम भरणे गरजेचे आहे. ती तुम्ही भरली, आता हे सर्व प्रकरण आवार्ड डिक्लेअर झाल्यानंतर अवार्डमध्ये जी काही निवाडयाची रक्कम ठरलेली आहे ज्याच्यात मोबदला देण्याच ठरविलेल आहे. तो चॅलेंज करण्याचा अधिकार भुसंपादन करणारी संस्थेला या कायद्याप्रमाणे नागपुरच्या न्यायाधिकरणाने जरी निर्णय दिलेला नसला तरीही उच्च न्यायालयामध्ये तुम्हाला रिट याचिका दाखल करून हे जिल्हाधिकारीचा हे अवार्ड चॅलेंज करता येईल. अश्या प्रकारचा त्यांनी अभिप्राय दिला आणि आता अवार्ड चॅलेंज करण्याच्या मुद्दयावरून आता आपण त्याठिकाणी उच्च न्यायालयामध्ये जाण्याच ठरविल. आता हे करत असतांना अॅड.ब्रम्हेंनी याच्यामध्ये हे ही सांगितल की, या निमित्ताने आपण नुसता अवार्ड चॅलेंज करणार नाही तर या निमित्ताने आपण भुसंपादनाची जी उच्च न्यायालयाने आदेश दिलेले होते. त्याच पुन्हा प्रोव्हीजन उच्च न्यायालयाने करावा की, तत्कालीन नगरपालिकेने १९९५ मध्ये केलेली रिट याचिका विचारात घेता, ही जागा आता नव्याने संपादन करण्याची गरज नाही. ही ऑलरेडी जागा संपादीत केलेली आहे. त्याला रक्कम दिलेली आहे. त्यामुळे आता पुन्हा भुसंपादनाची गरज नाही. महानगरपालिकेच्या, प्रशासनाच्या किंवा आयुक्तांच्या संमतीविना महानगरपालिकेच्या त्यावेळेच्या वकीलाने उच्च न्यायालयामध्ये हे मान्य केल की, आम्ही भुसंपादन करु. आणि त्यामुळे महानगरपालिकेला भुसंपादन कराव लागणार आहे. आमची सार्वजनिक संस्था आहे. हा जो काही पैसा दिला जाणार आहे. हा सार्वजनिक स्वरूपाचा आहे. नागरीकांच्या खिश्यातुन जमा होणाऱ्या रकमेतुन आपण हे खर्च करत आहे. त्यामुळे सार्वजनिक हिताच्या दृष्टीन या सगळया उच्चन्यायालयाने आता पर्यंत केलेल्या निर्णयांचे पुन्हा विचार करण गरजेच आहे. या प्रकारे हे दोन्ही मुद्दे त्याच्यामध्ये टाकुन आपण उच्च न्यायालयाकडे चॅलेंज कराव.अश्या प्रकारच ठरल.दरम्यानच्या काळामध्ये मागच्या महिन्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने एक असाही आदेश दिलेला आहे. एखाद्या पक्षकाराच्या संमतीविना जर त्याच्या वकीलाने न्यायालयामध्ये अस कुठल स्टेटमेंट केल. त्याच्यामुळे पक्षकाराचे जे कायद्याने दिलेले किंवा घटनेने दिलेले जे मुलभुत अधिकार आहे. ते जर हिरावुन घेतलेले असतील. तर अश्या प्रकारच वकीलाने दिलेल स्टेटमेंट ते अंतिम समजु नये.म्हणजे थोडक्यामध्ये जर भुसंपादन करण्याची गरज नाही अस महानगरपालिकेच म्हणण असेल परंतु ऐन वेळेला आपल्या वकीलने भुसंपादन करु अश्या प्रकारच जर स्टेटमेंट केल असेल आणि ते आपल्याच वकीलाने केलेल स्टेटमेंट आपल्याला मान्य नसेल तर त्याच्या बद्दल आपण न्यायालयाला पुन्हा विनंती करु शकतो की, आमच्या वकीलाकडुन ही झालेली त्रुटी आहे. महानगरपालिका म्हणुन आम्हाला ते मान्य नाही, आम्हाला भुसंपादन करण्याची आवश्यकता नाही. न्यायालयाने या आदेशाचा फेरविचार करावा. या सर्व मुद्दयांवरती आपण पुढे जायच ठरविल. दरम्यानच्या काळामध्ये मी आता सांगितल्याप्रमाणे, तिसऱ्या टप्प्यामध्ये कोर्टची उच्च न्यायालयाने आदेश काढल्याबद्दलच जे जिल्हा सरकारी वकीलांकडुन आलेल पत्र आहे ४ जानेवारीला घेतलेल आहे. जर ४ जानेवारीला कोर्टाने ते दाखल करुन घेतलेल असतील तर त्याच वेळेला आपल्याला ती रक्कम भरावी लागेल. अदरवाईस न्यायालयाचा अवमान झाल्या सारख असेल. हे होऊ नये म्हणुन मला आठवत, त्या वेळेला सन्मा.सभापती होते, सन्मा.महापौर होत्या.सन्मा.आमदार साहेब होते, या सगळयांशी प्राथमिक चर्चा झाली की अशी अशी केस आहे. आपल्याला उच्च न्यायालयामध्ये जाव लागेल. अदरवाईज १५ कोटींचा आपल्या फटका बसु शकतो. आता पर्यंत वेळोवेळी झालेले सर्व दावे विचारात घेता, आपल्याला याच्यामध्ये आपल्या पॅनलच्या बाहेर जाऊन एक सिनियर कॉन्सील कि ज्याचा प्रभाव उच्च न्यायालयावर पडेल आता आपली संपुर्णपणे नाकारात्मक झालेली बाजु आपण सकारात्मक पध्दतीने कशी वळविता येईल. या दृष्टीने आपल्याला सिनियर कॉन्सील नेमावा लागेल. आता सिनियर कॉन्सीलच्या फि जे आपण ठरवितो त्याच्यापेक्षा जास्त असतात. आणि ते कशी फि आकारतात खाजगी प्रकरणांमध्ये पाहतो आपण. या पार्श्वभुमीवरती आपण पदाधिकाऱ्यांची मान्यता घेऊन आपण रिट दाखल करायच ठरविल.त्याच्यामध्ये हीच चर्चा झाली की, आपण स्थायी समितीची मान्यता घेऊ या. कारण रक्कमही जास्त आहे आपल्या पॅनलवरचे वकील नाही. म्हणुन स्थायी समितीच्या बैठकीमध्ये आपण हा विषय घेऊ या. आणि स्थायी समितीची बैठक होऊन आपण त्याला मान्यता देऊ या. दरम्यानच्या काळामध्ये पुन्हा विलंब होऊ नये. कारण एकदा विलंब झाल्यामुळे सुप्रिम कोर्टाने निकाली काढलेल आहे. त्यामुळे आपल्याला मुदतीमध्ये ही याचिका दाखल करावी. अश्या पध्दतीची चर्चा झाली आणि त्याप्रमाणे आपण ४ जानेवारीच्या आत ही याचिका मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद मध्ये दाखल केली. आता ही सर्व जर परिस्थिती विचारात घेतली. तर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा जर विचार करायचा असेल तर आपल्याला आपल्या पॅनलच्या बाहेरचा वकील जो सिनियर आहे उच्च न्यायालयाची न्यायमुर्ती म्हणुन

त्यांची शिफारस झाल्यानंतर त्याच क्षेत्रामधील आपल्या पॅनलवरचे वकील ही सांगत आहे. आणि म्हणुन आपण नेमुया आणि म्हणुन हे आपल्या नेहमीच्यापेक्षा ज्यादा फी आणि नेहमीच्या पॅनलच्या बाहेरचे वकील नेमुन पुन्हा एकदा एवढी मोठी रक्कम अदा करण्यापुर्वी महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने पुन्हा न्यायालयासमोर बाजु मांडायचा आपण निर्णय घेतलेला आहे. अर्थात आपले पॅनलवरचे वकील असतील किंवा श्री.ब्रम्हे साहेब असतील. त्यांच म्हणण अस आहे की, आपल्याला उच्च न्यायालयासमोर पुन्हा एकदा हे सगळं म्हणण मांडण्याची संधी आहे. तर ह्या संधीचा फायदा घेऊ या. जर उच्च न्यायालयाला पटल तर महानगरपालिकेचा मोठा आर्थिक तोटा होणार होता तो होणार नाही. उच्च न्यायालयाला नाही पटल तर शेवटी आपल्याला न्यायालयाच्या आदेशाच पालन कराव लागेल. या पार्श्वभुमीवरती पदाधिकाऱ्यांशी झालेली चर्चा, पॅनलवरचे सर्व ॲडव्होकेटशी झालेली चर्चा आणि मागच्या १९९५ सालापासुनची परिस्थिती विचारात घेता,एक विशिष्ट परिस्थितीमध्ये आपण हा घेत असलेला निर्णय आहे. म्हणुन मी म्हटल की, कुठलाही निर्णय हा योग्य की अयोग्य असा फक्त आयसोलेशनमध्ये विचार न करता, परिस्थितीने जस आपण म्हणतो, त्याच संदर्भ विचारात न घेता एखाद्या वाक्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला, तो चुकीचा ठरतो. त्या संदर्भामध्ये जे वाक्य वापरल गेलेलं आहे. तो विचारात घेतला तरच त्याचा खरा अर्थ आपल्याला कळतो. त्यामुळे आपण पॅनलच्या बाहेरच्या वकीलांची नियुक्ती करण्यामागची ही सर्व पार्श्वभुमी आहे. मला वाटत की, महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय घेणे योग्य राहील. म्हणुन हा प्रस्ताव आपण पदाधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेप्रमाणे आपण स्थायी समितीसमोर ठेवलेला आहे. मागच्या स्थायी समितीसमोर आयत्यावेळेत विषय घ्यावा अशी चर्चा केली होती. परंतु आपण आयत्यावेळेत कोणतेही विषय घेत नाही. सन्मा.सभापतीच म्हटले की, याच्या बाबीत आपण एक स्वतंत्र बैठकच घेऊ. त्या बैठकीमध्ये हा विषय मांडु. दरम्यानच्या काळामध्ये बैठक मांडण्याची प्रक्रिया आपण करणार आहोत. ते पुर्ण करु आपण परंतु उच्च न्यायालयामध्ये आपण याचिका दाखल करण्यासाठी आपण थांबायला नको. लवकरात लवकर आपण ही याचिका दाखल करु .त्याप्रमाणे उच्च न्यायालयामध्ये आपण याचिका दाखल केलेली आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हे रिट-पिटीशन दाखल करणार आहे का आपण ?

**मा.आयुक्त :-** नाही, रिव्हीजन आणि हे ओरिजीनल पिटीशन आहे, जे अवार्ड देण्याच जिल्हाधिकाऱ्यांनी, शासनाने जाहिर केलेल आहे. कारण त्या अवार्ड मध्ये आपण तीन चार गोष्टी नमुद केलेल्या आहेत. त्याची माहिती आपण जिल्हाधिकाऱ्यांना दिलेली आहे. नागपुरच्या ट्रॅब्युनल समोरही मांडलेली आहे. त्या अवार्डमध्ये जे काही किंमती ठरविलेल्या आहे. आपल म्हणण आहे की, या किमती बाजार भावापेक्षा जास्त किंमती ठरविले गेलेले आहे . ज्या वेळेला आपण वर्क लॅण्ड परचेस करतो, जस आपण म्हणतो की, एखादा लेआऊट जर आपण केला तर तो लेआऊट ठाराविक एरियापेक्षा जास्त असेल. त्यामध्ये आपल्याला १०% जागा ओपनस्पेसच्या वेळी लागते, १५% जवळपास जागा आपली रस्त्यामध्ये जाते. ज्या वेळेला अश्या प्रकारची जागा एन.ए.होते. महानगरपालिकेचा अंतिम लेआऊट मंजुर होतो. रस्ते, गटारी वगैरे केल्या जातात. दिवे लावले जातात त्या ठिकाणी आणि हे २५ ते ४०% क्षेत्र हे ज्या वेळेला त्याला रस्ते,गटार आणि ओपनस्पेससाठी सोडाव लागत. त्याच्यानंतर त्याचे जे प्लॉट तयार होतात. जे आपण रेडीरेकनरमध्ये पर स्कवेअर फुटाने बघतो. पर स्क्वेअर फुटाचा प्लॉट मिळतो. आता हे शेत जमीनी काही पर स्क्वेअर फुटाने खरेदी केल जात नाही. ते गुणठयावर किंवा ऐकरवर खरेदी केली जाते. परंतु या सर्व जर प्रक्रियेमध्ये बघितल आपण तर त्या ठिकाणी अश्या प्रकारे झालेले प्लॉटचे जे व्यवहार आहे. ते एका जमीनीच्या खरेदीसाठी वापरले गेले आहे. तर न्यायालयाचे सुध्दा असे आदेश आहे. २५% पासुन ६०% पर्यंत त्याला जे काही डेव्हलपमेंटसाठी येणारा खर्च आहे त्याच्या मधुन तुम्ही एकुण क्षेत्र तुम्ही मायनस केला पाहिजे. जर आपण १० हजार स्क्वेअर फुट शेत खरेदी करणार असु. तर किमान त्याच ४ हजार स्क्वेअर फुट हे ओपनस्पेस आणि गटार मध्ये जाणार. त्याला येणारा जो खर्च आहे. तो खर्च तो काय करतो मग प्लॉट धारकांकडुन वसुल करतो. अश्या प्रकारे प्लॉटींग झालेले लेआऊटमधील प्लॉटच्या किंमती किती या प्लॉटींग नाही. झालेल्या जागेपेक्षा निश्चितच जास्त असतात. आपण ज्या वेळेला क्षेत्र घेतलेल आहे त्यावेळेला लेआऊट मंजुर झालेल क्षेत्र नाही.तेथे काही गटार नाही किंवा काही नाही. आपण ज्या वेळेला लेआऊट केल त्यावेळेला हे सर्व सोडल ना. मग जिल्हाधिकाऱ्यांनी याच्यामध्ये जे काही अवार्ड केलेले आहे. ते अवार्ड आपल्याला मान्य नाही. या मुद्दयावरती आपण हे चॅलेंजही करतो आहे. आणि बेसिकली आपला मुद्दा असा आहे की, पण आम्हाला ही जागा संपादित करण्याचीच गरज

नव्हती. तत्कालीन नगरपालिकेने खाजगी वाटाघाटीने ही जागा संपादीत केलेली आहे . तर त्या मुद्दयावर आपण उच्च न्यायालयात गेलेलो आहोत. तर हे आपल ओरिजिनल ॲप्लीकेशन आहे.

**नगरसचिव :-** नितीनभाऊ, प्रस्ताव मंजुर का, सुचक आणि अनुमोदक कोण आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मी सुचक आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हो मंजुर आहे माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** नितीनभाऊ, प्रस्ताव मंजुर का? सर्वानुमते मंजुर आहे का?

**श्री.नितीन बरडे :-** हो मंजुर.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मौजे जळगांव स.नं.३३७/३ब/१ ते ४ या जमिनीवरील आरक्षण क्रं.४ व ५ चे भुसंपादन विषयी भुसंपादन अधिकारी,जळगांव यांनी दिनांक २०/०१/२०२० रोजी घोषीत केलेल्या निवाडयामध्ये निर्धारित केलेला मोबदला हा संबंधीत जमिन मालकांनी खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेस दिलेल्या ताबा दिनांकाच्या वेळीची मुल्यांकन तारीख विचारात न घेता सन २०१९ रोजीचे दर विचारात घेवून घोषीत केलेला आहे. ही बाब महानगरपालिकेच्या हिताची नसल्याने मनपा तर्फे मे.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल करणे व याचिकेचे मनपातर्फे संपुर्ण कामकाज पाहणे कामी ॲड.शैलेश पी.ब्रम्हे यांची नियुक्ती करणेस व त्याकामी ॲड.शैलेश पी.ब्रम्हे यांची फी अदा करणे कामी येणारे रक्कम रु.३ लक्ष मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव** :- **विषय क्र. २** :- जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०४/०५/२०२० ते दि.१०/०५/२०२०, दि.११/०५/२०२० ते दि.१७/०५/२०२०, दि.१८/०५/२०२० ते दि.२४/०५/२०२० व दि.२५/०५/२०२० ते दि.३१/०५/२०२० या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.किशोर बाविस्कर:-** माहिती घेतली , मी सुचक आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माहिती घेतली. माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन बरडे :-** साप्ताहीक अहवाल तर येतच नाही साहेब.

**मा.आयुक्त :-** येतो ना.

**श्री.नितीन बरडे :-** कुठे येतो. ३-४ मिटींग झाल्या मी तर बघितलाच नाही. हे यांचा नाही. अग्निश्मनचा नाही. ऑडिटचा. किती महिने झाले साहेब

**मा.आयुक्त :-** पुढच्या मिटींगला देणार आहे. सांगितल मी त्यांना.

**श्री.नितीन बरडे :-** पुढच्या मिटींगला मागचे २-३ देतात. मग पुढचे अजुन बाकी राहतात.

**मा.आयुक्त :-** पुढच्या मिटींगला देऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषयाला धरुन सांगतो. विषय असा आहे. आपण हे भुसंपादनाचे पैसे देतात. एवढ हे लोक केसेस करतात. विषय असा आहे. सर्व्हे नं.३४३ मधील १/२/३/४/५ प्लॉट आपल्या महापालिकेच्या नावावर लागलेले आहे. त्याच म्हणण पडत भुसंपादनाचे पैसे अजुनही महापालिकेने दिलेले नाही. तो अजुनही शेती पेरत आहे तेथे. क्रिडांगनाची जागा आहे. शाळेच्या आरक्षणाची जागा आहे. मी पत्रही दिलेल आहे तुम्हाला ती जागा ताब्यात घ्या तुम्ही नाही तर असा प्रकार पुन्हा उद्‌भवेल. जे आता ३३७ चा प्रकार झाला.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.०४/०५/२०२० ते दि.१०/०५/२०२०, दि.११/०५/२०२० ते दि.१७/०५/२०२०, दि.१८/०५/२०२० ते दि.२४/०५/२०२० व दि.२५/०५/२०२० ते दि.३१/०५/२०२० या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बाविस्कर किशोर रमेश**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ३ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे:-** मी सुचक आहे. मान्य आहे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./८८/ दि.१७/१२/२०२० अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.१७ सर्वे क्रं.७५/१/२, ७७/५/६ या दोन्ही क्षेत्रातील कॉमन महानगरपालिका मालकीच्या ओपनस्पेस जागेला चेनलिंक फेन्सींग कंपाऊंड करणे कामी मक्तेदार मनोज सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ८% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१९,९७,८९४/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)
२. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./८९/ दि.१७/१२/२०२० अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मधील इक्बाल कॉलनी खुल्या जागेस कुंपण भिंत बांधणे कामी मक्तेदार रुपेश प्रविण राणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१०% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१४,९५,३०२/- मात्र खर्चाची संविदा.
३. प्रशासकीय आदेश क्र./११०/ दि.३१/१२/२०२० अन्वये पाणी पुरवठा विभागा अंतर्गत वाघुर योजनेच्या १५०० मीमी ते ४५७ मीमी एम.एस.व पी.एस.सी. पाईपलाईन तसेच एअर व्हॉल दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेवर १% जास्तचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,८३,०६७/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, सर्वांनी राष्ट्रगीतसाठी उभ राहायच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** राष्ट्रगीत घेण्याची खुप घाई राहते तुम्हाला सभापती साहेब,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** थांबा मला त्या कुत्र्यांच्या विषयाबद्दल बोलायचे आहे.

**मा.सभापती :-** आपली मागची जी मिटींग होती ना. मागच्या मिटींगला आपला इतका वेळ गेला.

**श्री.नितीन बरडे :-** मागच्या मिटींग मध्ये.

**मा.सभापती :-** थांबा एकुन घ्या ना. तुम्हीही बोला नंतर. त्याच प्रोसिडींग करायला ते या सभेपर्यंत कम्प्लीट झाल नाही. तर आपल्या ज्या अवांतर चर्चा आहे, तर प्रोसिडींगच्या बाहेर आपल्याला न घेता येणारे विषय असतील. तर मला वाटत ते आपण चर्चा झाल्यानंतर आपण चर्चा करावी. अवांतर चर्चा म्हणत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मागच्या सभेत ज्या चर्चा झाल्या त्याच काय झाल ते तर विचारु द्या आम्हाला.

**मा.सभापती :-** विचारा, विचाराना विचारा.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** नळ तोडुन ठेवलेले आहे त्या अमृत योजनेवाल्यांनी, अमृतवाले सांगतात अधिकाऱ्यांच काम आहे आणि अधिकारी सांगतात त्यांच काम आहे. आणि पैसे वसुल करत आहे हे लोकं.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमृत ड्रेनेजच पत्र दिलेल आहे त्यांना.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** पण आपल्या अधिकाऱ्यांचपण काम आहे साहेब काम सुरु असतांना तेथे याचं. नंतर आम्हाला त्रास होतो ना साहेब तो. आणि नागरिकांना हे जे कनेक्शन जोडुन देतील. त्याचे पुर्ण पैसे मागतात त्यांच्याकडुन.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** गटारींचे ढापे तोडुन टाकलेले आहे. तुम्ही पाहणी करा काय परिस्थिती आहे.

**श्री.सुशिल साळुंखे :-** अमृतच्या कामात जर नळ कनेक्शन तुटला असेल. जर पाईप लाईनच काम असेल तर जैनवाले दुरुस्त करुन देतात. फक्त काय असत आपला इंजिनिअर, आपल्याकडे व्हॉलमन जसा कमप्लेन करतो आपण त्यांना यादी देत असतो. त्यांच्या माध्यमने ते जोडुन देता.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** नाही ना साहेब, ते म्हणतात अमृतवाल्यांच काम आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सर माहित आहे ठेका घेतलेला आहे. जैनवाले दुरूस्त्या करतात माहित आहे. काम करतांना तुमचे माणस त्याच्यावर राहतात का ? तुमचे माणस त्याच्यावर राहतात का ? आठ दिवस झाले मी माझ्या कॉलनीत फिरत आहे ३ कनेक्शनसाठी. पाणी येत नाही ३ घरांना, नंतर महाबळ पोलिस चौक पाशी मोठा खड्डा पडला आहे. आज एका सन्मा.नगरसेविकेचा फोटो आहे पेपरात हात तुटल्याचा. मला सांगा तुमचे इंजिनियर त्याच्या बरोबर कामाला राहता का ?

**सौ.प्रतिभा देशमुख :-** नाही साहेब, ते पुन्हा पैसे मागतात नाईलाजाने द्यावे लागतात.

**श्री.नितीन बरडे :-** मी ३ सप्लाय झाले लोकांना पाठवत आहे तेथे. तुमच्या व्हॉलमनला पाठवत आहे पाणी का येत नाही चेक करा. तुम्ही ठेकेदारावर ढकलुन मोकळे होतात.

**श्री.सुशिल साळुंखे :-** नाही, ठेकेदारावर ढकलुन मोकळे नाही होतात. त्यांनी जर केल नाही तर शेवटी आपण आपल्या माणसांकडुन करुन घेता.

**श्री.नितीन बरडे :-** तुमचे लोक जर सोबत असले तर लगेच होत ना. कुठे पाणी कनेक्शन आहे, कुठे काय आहे. त्यांना माहिती आहे का काम करणाऱ्यांना.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** साहेब पण काम करतांना आपले अधिकारीपण हजर पाहिजे ना.

**श्री.नितीन बरडे :-** नंतर ३-४ दिवसाने त्यांचे लोक पेमेंट मागतात सामानाला.

**मा.आयुक्त :-** अमृतचे कामामध्ये करण्यात येत अस.

**श्री.नितीन बरडे :-** हा अमृतच्या कामामध्ये होत अस.तुमचे कोणते इंजिनिअर सोबत राहतात आणि तुमचे कोणते माणस सोबत राहतात मला सांगा.

**श्री.सुशिल साळुंखे :-** एक गोष्ट आहे. आता प्रत्येक लाईनवर इंजिनिअर राहु शकत नाही पण एक एक माणुस तेथे काम सुरु असेल तेथे असायला पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** इंजिनिअर नाही तर माणुस तर पाहिजे तेथे व्हॉलमन पाहिजे त्या एरियातला काम करतांना. त्या लाईनी कोण सांगणार आहे. पाईपलाईनी कोण सांगणार आहे.

**मा.सभापती :-** त्या ठिकाणी जर आपले इंजिनिअर राहु शकत नसले तरी

**श्री.सुशिल साळुंखे :-** माणुस ठेवतो सर आपण.

**मा.सभापती :-** नाही, नागरीकांचे जेव्हा समस्या येतात, प्रश्न येतात.मला वाटत ते दोन दोन तीन तीन वेळा कार्यालयात चक्कर मारुन जातात. तर आपण ती दुरुस्ती करुन द्यायला पाहिजे लवकरात लवकर.

**श्री.नितीन बरडे :-** सर महाबळ कॉलनीच्या पोलिसचौकी समोरचा रस्ता छोटा आहे. तेथे नाली आहे, तेथे मोठ्ठा खड्डा पडलेला आहे वनसाईडने एका साईडने ट्रॅफिक चालु आहे. आज पंधरा दिवस झाले तो खड्डा तसाच आहे. बाकीचे खड्डे तर मी बुजुन टाकले बळजबरीने असच रस्त्यावर टर्नवर खड्डे होते.

**मा.आयुक्त :-** १५ दिवस लागता का त्याला.

**श्री.सुशिल साळुंखे :-** नाही नाही. हॅड्रोलिक टेस्टींग करतो तोपर्यंत तो तिथे असतो पंपींग करतो तेव्हा आपल्याला उघडच ठेवाव लागत.

**श्री.प्रशांत नाईक :-** ही टेस्टींग दोन दोन तीन तीन महिने होत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, सर टेस्टींग होऊन गेलेली आहे.

**मा.आयुक्त :-** हॅड्रोलिक टेस्टींगच फॅलोअप घेता का ?

**प्रकल्प अभियंता, श्री.बोरोले :-** सर ते लुप पुर्ण केल्यानंतर ते हॅड्रोलिक टेस्टींग करता पुर्ण लुपची. एक लुप जो असतो पुर्ण, त्याला पुर्ण केल्यानंतर त्याची हॅड्रोलिक टेस्टींग करतात.

**मा.आयुक्त :-** म्हणुन एका लुपला १५ दिवस लागतात का?

**श्री.सुशिल साळुंखे :-** जो पर्यंत हॅड्रोलिक टेस्टींग पुर्ण होत नाही.

**प्रकल्प अभियंता, श्री.बोरोले :-** त्याच्यात जर लिकेज आला तर त्यांना ते शोधाव लागतो.

**श्री.प्रशांत पाटील :-** साहेब आमच्या भागामध्ये मेहरूण गावठानला २ महिन्यापासुन टेस्टींग झालेली नाही. आमचा फक्त गावठानचा ४- ५ मिटरचा भागात एकच ट्रॅक्टर फिरत. पाईप एवढे पडलेले आहे तेथे.

**श्री.नितीन बरडे :-** तो टेस्टींगचा खड्डा नाही.

**मा.आयुक्त :-** नितीन भाऊ तुमच्या एरियाला जो डि.एस.आर. लागेल. पाण्याच्या टाकीला आपल्याला जो कनेक्शन जोडायच आहे. ते झाल की, टेस्टींग आपल्याला करता येईल. आपण ज्यावेळेला जागा बघितली त्यावेळेला ठरवले होते. कुठला खड्डा आहे तो बुजुन घ्यायची. तुम्हाला लिकेज सापडत नाही का? योगेश.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** सर त्यांच्या याच्यात जर लिकेज असल तर त्याला शोधायला वेळ लागतो.

**मा.आयुक्त :-** आताच काय जे नितीनभाऊ म्हणत आहे.

**श्री.सुशिल साळुंखे :-** ठिक आहे ते मी पाहुन घेतो उद्या.

**श्री.नितीन बरडे :-** लिकेज म्हणजे कनेक्शन आम्ही तुम्हाला दाखवतो आहे त्याच्या येच्यात, साहेब जे.सी.बी.ने जेव्हा ओढतात ना नागरीकांचे पाणी कनेक्शन कुठेतरी ओढले जातात.आम्ही दाखवितो की, हे कनेक्शन निघुन गेलेल आहे कुठेतरी, याच्यात माती घुसलेली आहे.हे जोडुन द्या नविन करुन द्या. पाणी येत नाही लोकांना.

**मा.आयुक्त :-** प्रत्येक ठिकाणी इंजिनिअर ठेवणे शक्य नाही. पण असे वस्तु व्हॉलमनला माहित असतात. तर त्या दिवशी व्हालच पाणी सुरु करतांनाही बंद करतांना ही व्हॉलमनला त्या ठिकाणी द्या. हे म्हणत आहे त्याप्रमाणे कोणती पाईपलाईन कुठुन गेलेली आहे. हे माहित आहे. त्यामुळे त्याच्याकडुन जे काही कनेक्शन काम करतांना तुटणार, जाणुनबुजुन कोणी तोडणार नाही. पण ताबडतोब रिपेअर करून दिल्या पाहिजे. मग यामुळे अडचण होणार नाही. आणि हा एक विषय मार्गी लावा पहिले.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब मी जो खड्डा सांगत आहे. तो टेस्टींगचा नाही. ताईंच्या वार्डातला खड्डा आहे.

**मा.सभापती :-** खात्री करुन घ्या ना.

**श्री.नितीन बरडे :-** रस्ता बंद झाला आहे.

**मा.सभापती :-** खात्री करा आणि ताबडतोब बुजा.

**सौ.सरिता नेरकर :-** महावीर नगर येथे तो खड्डा झालेला आहे आणि त्या जागी हे अमृतच काम आहे अस सांगितल जात आहे. आणि आज ते डाबीने भरलेल आहे. महावीर नगर मध्ये अक्षरश: मातीच पाणी जात आहे लोकांच्या मोटरीमधुन आणि फोन म्हणे सगळया महापालिकेचे फोन बंद आहे अधिकाऱ्यांचे अस मला सांगण्यात आल महापालिकेत.

**श्री.नितीन बरडे :-** नविन नंबर आलेले आहे सर्वांचे.

**मा.आयुक्त :-** तुम्ही नवीन नंबर घ्या.

**श्री.सुशिल साळुंखे :-** ते का होत. त्यांनी एका ठिकाणी काम सुरु केल की, लगेच दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट होऊन जाता. तर ते पुर्ण केल्याशिवाय येत नाही.

**मा.आयुक्त :-** नगरसेवकांना हा विषय स्थायी समितीमध्ये मांडण्याची गरज यायला नको. पुढे अशी वेळ आणु नका.

**सौ.सरिता नेरकर :-**आणि ते डायरेक्ट सांगतात की, हे आपल काम नाही मॅडम हे अमृतच काम आहे.

**मा.आयुक्त :-** अमृतच काम म्हणजे आपलच आहे ना.अमृतच काम आपणच दिलेल आहे.

**सौ.सरिता नेरकर :-** हे मला किती वेळा सांगितल गेलेल आहे की, हे आपल काम नाही.

**श्री.सुशिल साळुंखे :-** मगाशी अशीन पण आता तुम्ही मला संपर्क करा आता असा विषय येणार नाही.

**मा.आयुक्त :-** तुम्ही जे तुमच्या भागातले इंजिनिअर आहे ना त्यांच्याशी संपर्क करा. आणि इंजिनिअरला सुचना करा, ज्या त्या ठिकाणाची अडचण त्याच ठिकाणी सोडवा. येथे तक्रारी आणायची काही गरज नाही. आणि लोकांना अस नाही वाटायला पाहिजे की, हे अमृतच काम आहे. अमृतच काम त्यांच्याकडुन करुन घेण्याची जबाबदारी आपली आहे. आपल्या खालती ते एजन्सी म्हणुन काम करत आहे. आपल्यावर जबाबदारी नाही का येत ही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब आता माझ्या प्रभागामध्ये रेल्वे मेन रोड, आता मेन लाईनच्या टाईमाला आपल्या ज्या क्रॉसींगच्या काही गटारी जातात त्याचे ढापे तोडुन टाकले आहे. पाणी आता गटारीतुन वाहुन नाही राहिल. वरतुन रोडावर पाणी येतो. त्याच्या अजुन लाईन फुटल्यानंतर त्याच्यात गडुळ पाणी आपल्या नाल्याच जातो. आता शिवाजीनगरला एकच रस्ता आहे. मेन रोड खोदुन टाकलेले आहे. १० दिवस झाले खोदुन ठेवलेले आहे अजुन त्यात पाईप लाईनच टाकलेली नाही. फक्त पंपींग करुन ठेवलेल आहे. ढापे तोडुन पाईप लाईन कापली गेलेली आहे. तुम्ही पाहा तेथे दवाखान्या जवळ परिस्थिती काय आहे.

**मा.आयुक्त :-** काल खोदली आहे ती.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही परवा खोदली गेलेली आहे. मी बोलल्यावर केली त्यांनी.

**मा.आयुक्त :-** आपल्या दवाखान्यासमोर पाईप लाईन टाकली आहे मला वाटत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** टाकली आहे पण या बाजुला खोदली तुम्ही परवा ती तशीच ठेवली उलट ढापे तोडुन टाकले.

**श्री.सुशिल साळुंखे :-** ब्रेकर आणि दोन तीन जर सोडले तर कॉंक्रीटचे रोड आहे सगळे.

**मा.आयुक्त :-** साळुंखे आणि बोरोले, अनावश्यक कुठेही खोदुन ठेवु नका. आणि खोदुन ठेवल्यानंतर लवकरात लवकर पाईपलाईन टाकली गेली पाहिजे. कॉरडीनेशन व्यवस्थीत ठेवा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब ड्रेनेजचे जे मोठे चेंबर्स आहे ना ते सुध्दा फोडलेले आहे यांनी. आता कोण रिपेअरींग करीन त्याच. हे सांगता अमृतवाले, अमृतवाले सांगतात ड्रेनेजवाले. माझ्या वार्डामध्ये आज दोन महिन्यापासुन त्या गटारी तसेच्या तसेच पडलेले आहे.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे ते करुन देऊ. पुढे काही असा विषय येणार नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- तुम्ही जर केले नाहीतर पाणीच निघणार नाही साहेब.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे करु दुरुस्ती

**श्री.नितीन बरडे :-** आपले रस्ते दुरुस्ती ची गाडी सुरू झाली का साहेब शनिवार गेला सोमवार गेला.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** सुरु झाली ना. बाहेरचे रोड केल ना आपण.

**श्री.नितीन बरडे :-** बाकीच मग कधी करणार आहे दुरुस्त्या. जे बाकी होत ते रोड पुर्ण करुन घेतले, येथुन तर टॉवर पर्यंत पुर्ण रोड करून घेतले.

**श्री.प्रशांत नाईक :-** अभिनंदन आहे प्रशासनाचा.

**श्री.नितीन बरडे :-** मी केव्हा पासुन सांगत आहे तुम्हाला, आकाशवाणी पासुन ते संत गाडगेबाबा पर्यंत तुम्ही मातीने बुजविलेले आहे खड्डे.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** पुर्वी मुरुमने भरण्याची वर्कऑर्डर होती तर मुरुमने भरले होते.

**श्री.नितीन बरडे :-** वर्कऑर्डर नाही मॅन्युअली केल ना. वर्कऑर्डरचे मातीने थोडी बुजले आहे. मातीने बुजायची वर्कऑर्डर काढली आहे का तुम्ही.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** मातीने कुठेच भरलेले नाही सर.

**श्री.नितीन बरडे :-** जेवढे आकाशवाणी पासुन खड्डे आहे ते मातीने बुजलेले आहे अक्षरश:. आपली गाडी चालु झाली का दुरुस्तीची. डांबर तुमच्याकडे अव्हेलेबल आहे.

**मा.आयुक्त :-** आता तुम्ही कोणता रस्ता घेतलेला आहे.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** ही चारी केली गेली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** ही चारी दुरुस्त करत आहे साहेब ते. अमृतची जी ड्रेनेजची चारी आहे ना. ती दुरूस्त करत आहे.

**मा.आयुक्त :-** ते पण आपल्याला करायचे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** ते पण आपल्यालाच करायचे आहे का ?

**मा.आयुक्त :-** ड्रेनेजच पण काम आपल्यालाच करायचे आहे. एक लक्षात घ्या. दोन्ही योजना अमृतच्याच आहे. अमृत म्हणजे पाणी पुरवठा नाही, अमृत म्हणजेच या दोन्ही योजना वेगवेगळया नाही आहे. यावर आपण मागेही चर्चा केलेली होती. पाणी पुरवठयाच्या इस्टीमेट मध्ये रोड रिपेअरींगच्यासाठी आपल्याला तरतुद झालेली आहे. परंतु भुयारी गटारच्या बाबतीत अश्या प्रकारची तरतुद नाही. भुयारी गटारसाठी ज्या ज्या आपण चाऱ्या खोदलेल्या आहे. त्याची दुरूस्ती ही आपल्याला महानगरपालिकेनेच करायची आहे. ते आता जे आपल्यासमोर करत आहे ते अस पण आपल्यालाच कराव लागणार होत. आता तुम्ही ते टॉवरचौक करुन घ्या त्याच्यानंतर महापालिका ,नेहरु चौक ते महाबळ पर्यंतचा असा रस्ता करुन टाका.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** मेन रोड घेऊन घेतो साहेब.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब, मलनिस्सारण योजनेच काम केव्हा सुरु झाल. चारी येथे फक्त २४ घंटयात बुजण्यात आली बाकी ठिकाणी जेथे सुरु झाल आहे वर्षापासुन तेथे अजुन पण महापालिकेने चाऱ्या बुजलेले नाही साहेब. अभिनंदनास पात्र आहे आपली महानगरपालिका, आम्हाला तर प्रशासनाचा सत्कार करावा अस वाटत. तुमच्या महानगरपालिके खाली अवघ्या २४ तासात बुजविण्यात आल्या.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** मेन रोड असल्यामुळे आपण सगळे ट्रॅक्टर बोलविले आणि अर्जंटमध्ये करून घेतल ते.

**श्री.प्रशांत नाईक :-** हो इमरजन्सी , अर्जंट होत तेथे नागरीकांसाठी, बाकीच्या एरियांमध्ये नागरीक राहत नाही. तुम्ही बाकीच्या एरियात जाऊन पहा. एक एक ठिकाणी चार चार नागरीक पडत आहे. त्या ऑर्किड हॉस्पीटल जवळ उपमहापौर गेले होते स्वत:, काल नगरसेविका बाई पडली.

**श्री.नितीन बरडे :-** परवा चार फोटो होते, पुष्पलता बेंडाळे चौकात चार लोकं पडल्याचे न्युजपेपर मध्ये, चार वेगवेगळे फोटो होते.

**श्री.प्रशांत नाईक :-** म्हणजे येथेच झाली का या कामाची सुरुवात. याच्या आगोदर नाही झाली का ?

**मा.आयुक्त :-** आपल्याला सगळेच रस्ते दुरुस्त करायचे आहे. मी तुमच्याच प्रश्नाच उत्तर देतो आहे.सगळयाच रस्त्यांची दुरूस्ती करायची आहे. प्रत्येक प्रभागामध्ये वेगवेगळ एजन्सीचे त्यांचे त्यांचे काम सुरु झालेले आहे. काही एक दोन ठिकाणी राहिल असेल तर सुरु होईल ते. आता महानगरपालिकेच्या स्वत:च्या वाहनामार्फत जे कामे सुरु होत आहे ते काल पासुन त्याच काम सुरु झालेल आहे. महानगरपालिकेसमोरच जे तुम्ही म्हणत आहे. ते पहिले टॉवर चौकापर्यंत घेत आहे. त्यानंतर हा मेन रोड जो आहे आकाशवाणी आणि महाबळ पर्यंत तो केला जाईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब जर फक्त मेनरोड करणार तर गल्ली बोळातले रस्ते केव्हा होईल.

**मा.आयुक्त :-** आपल्याला प्रशांतभाऊ सगळीच कामी दुरूस्तीची करायची आहे. कोणततरी काम आज आणि कोणततरी काम उद्या करावच लागणार आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब आपली गाडी चार दिवस चालते आणि पाचव्या दिवशी बंद पडते आपली गाडी.मग मटेरियल संपुन जाईल आपल्याकडच. तुम्ही मेन रोड करुन सोडुन द्याल.

**मा.आयुक्त :-** लक्षात घ्या महापालिकेसमोरची जरी चारी बुजवली तर त्याचा फायदा शेवटी सगळयांनाच होणार आहे. आपल्याच नागरीकांना होणार आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब तुमचा येण्याजाण्याचा मार्ग आहे ना तो, त्याचा फायदा तुम्हालाच होणार आहे.

**मा.आयुक्त :-** शेवटी आज हे का आणि उद्या हे का ? आपल्याला सगळीच कामे करायची आहे. कोणततरी काम आज करायच आहे कोणततरी काम उद्या करायच आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सर अमृतच ड्रेनेजच जे काम आहे त्याचे काही डिझाईन चुकलेले आहेत का ? विसनजी नगर म्हणा, बळीराम पेठ म्हणा, नवीपेठ म्हणा, मेन रस्त्यावरुनच आहे का फक्त ड्रेनेज.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** नाही आतल्या रस्त्यांवर आहे या भागात. या भागात आतल्या रस्त्यांवर आहे.

**श्री.नितीन बरडे :-** हे जे जुने लेआऊट आहे साहेब शहरातले, आता मेन रस्त्यांने ड्रेनेजच्या लाईन गेलेल्या आहेत.यांच्या भंगीबोळ मागच्या बाजुला आहे.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** हो, हो. ज्या ठिकाणी भंगीबोळ टाकता आलेल्या आहे त्या ठिकाणी आपण टाकलेल आहे. ज्या ठिकाणी भंगीबोळामध्ये दोन्ही बाजुच्या सेप्टीक टँक जोडुन आलेल्या आहेत. त्या ठिकाणी जो पर्यंत आपण आपली लाईन चालु करत नाही. तो पर्यंत सेप्टीक टँकच वापर बंद राहिल त्या ठिकाणी.

**श्री.नितीन बरडे :-** सेप्टीक टँक आता विसनजी नगर मध्ये आहे साहेब तेथे गटार नव्हती.आजपर्यंत गटार नाही त्या रस्त्यांवर. त्या रस्त्यांवर ड्रेनेजची लाईन आहे. आणि त्याच्यामागे दोन्हींच्या सेप्टीक टँक आहे. मग ते केव्हा? असे बाहेर नेतीन का ते पाईप.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** मग बाहेर नेतील ना ते पाईप.

**श्री.नितीन बरडे :-** रस्त्याच्या त्या साईडने त्यांच्या घरांमधुन.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** नाही नाही त्यांच्या घरांमधुन नाही. त्याच्या बॅकसाईडने त्यांची जी सेप्टीक टँक आहे. लाईन टाकायला जर तेथे जागा असेल अन्डरग्राऊंड तर तेथे टाकल जाईल.

**श्री.नितीन बरडे :-** आहो, मोठ मोठे रोड आहे, ९-९ मिटरचे रोड आहे.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** नाही, नाही, त्या ठिकाणी लाईन टाकलेली आहे. दोन्ही सेप्टीक टँक साईडने जवळ जवळ आलेल्या आहे. तर त्या ठिकाणी लाईन टाकायला जागा नाही.

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही जरा तपास घ्या विसनजी नगर मध्ये, ज्या रस्त्यावर नाल्या आजपर्यंत नाही. त्या रस्त्यावर भुयारी गटारी झाल्या आणि भंगीबोळच्या येथे दोन सेप्टीक टँकच्या मधुन ती ड्रेनेज यायला पाहिजे होती. ते रस्ते सुटलेले आहे यांचे. डिझाईनी चुकल्या आहेत साहेब, मी माझ्या अमृतच्या योजनेत पाईप लाईनच कधीचच सांगत आहे.

**मा.आयुक्त :-** एखाद्या ठिकाणी प्रॉब्लम येऊ शकतो.

**श्री.नितीन बरडे :-** एक ठिकाणी नाही साहेब.

**मा.आयुक्त :-** एक ठिकाणी झाल की, लगेच आपण निष्पण नको काढायला त्याच्यामध्ये.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब तुम्ही बघा मोठा एरिया आहे.

**मा.आयुक्त :-** नितीन भाऊ योजना आपण घेतलेली आणि योजनेच्या एवढया मोठया कामामध्ये भौगोलीक अडचणी येणार आहे. अस नाही की, कुठल्याही योजनेची अंमलबजाणी करतांना कोणतीही अडचण येणार नाही. त्या त्या अडचणींवर आपल्याला तेथील स्थानिक परिस्थिती बघुन आपल्याला मार्ग काढावा लागेल.याचा अर्थ ही योजना पुर्णपणे चुकीची झालेली आहे अस आपल म्हणणही बरोबर नाही होणार.आता तुम्ही जे म्हणत आहे, या भागामध्ये ज्या ठिकाणी पाठीमागे सेप्टीक टँक आहे. भंगीबोळ जे काही आपण म्हणतो. अश्या ठिकाणी लाईन आपण टाकत असतील. काही ठिकाणी असे प्रॉब्लम येणार आहे की, लाईन टाकता येत नाही म्हणुन सेप्टीक टँक मागच्या बाजुला आहे. अश्या ठिकाणी त्याचे आपल्याला टेकनिकल सोल्युशन काढाव लागेल. आता एक सोल्युशन सगळया ठिकाणी लागु होईल अस नाही. त्या त्या ठिकाणी आपल्याला परिस्थिती बघुन हे कराव लागेल. आणि योजनेमध्ये रोज येणाऱ्या अडचणी आपल्याला दररोज सोडुन आपल्याला ही योजना पुर्ण करावी लागेल.

**श्री.नितीन बरडे :-** सर तुमच म्हणण बरोबर आहे. ६-६ ८-८ मिटरच्या भंगीबोळ आहे. म्हणजे आज तेथे रस्ते आहे.

**मा.आयुक्त :-** त्याला अडचण काय ?

**श्री.नितीन बरडे :-** मग तेच विचारत आहे ना मी. मला तेच विचारायच आहे की, गावात काय आहे.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** महानगरपालिकेच्या खालीपण एक बोळ आहे.

**श्री.नितीन बरडे :-** नवीपेठ फिरले आहे का तुम्ही सर्व. नवीपेठच्या भंगीबोळा पाहा. मोठमोठे रस्ते आहे, तिथुन ड्रेनेज यायला पाहिजे. मेन रस्त्यावरुन आहे. नागरीक कसे काय पाईप आणतील तिकडन

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** मागच्या साईडला मी चेक केल भाऊ ते. मागच्या साईडला दोन सेप्टीक टँक अश्या जवळ जवळ आलेल्या होत्या.

**श्री.नितीन बरडे :-** बोरोले साहेब तुम्ही चुकीची माहिती देत आहे. चुकीच हे करतात. मी सिध्द करुन दिलेल आहे तुम्हाला आणि त्यांना की, पाईप लाईन माझ्या वार्डात चुकीची टाकली जात आहे. त्यांनी कबुल ही केलेल आहे. एम.जी.पी. वाल्यांनी ही कबुल केलेल आहे. पण आजपर्यंत ते आलेले नाही त्या ठिकाणी. कबुलही केलेल आहे, २५० ची लाईन पडत नाही त्यांच्याकडुन आजपर्यंत.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** डिस्ट्रीब्युशन मध्ये त्यांचे काही चेंजेस होते सर.

**श्री.नितीन बरडे :-** आजपर्यंत पत्र भेटत नाही. एम.जी.पी. वाल्यांच आणि तुमच. बोरोले साहेबांनी आजपर्यंत सर्व्हे केला नाही तेथे.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** पत्र तर दिल ना भाऊ.

**मा.आयुक्त :-** मागच्या मला वाटत दोन तीन महिन्यापुर्वी एका बैठकीनंतर तुम्ही आणि आपले एम.जी.पी.चे एक्झीकेटीव्ह इंजिनिअर त्यांची एकदा व्हिजीट ही झाली त्या ठिकाणी.

**श्री.नितीन बरडे :-** सर्व झाल साहेब आणि सर्वांनी कबुल केल साहेब की, हे डिझाईन चुकीच झालेल आहे. पण काम होत नाही.निर्णय होत नाही. तोंडी कबुल केल, मणियार साहेबांनी बदली करुन घेतली. माफ करा म्हणे मला जावु द्या. मी त्यांना सांगितल होत की, तुम्हाला पकडेल मी.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे, मी एक्झीकेटीव्ह इंजिनिअरला सांगतो की, त्याच्यामध्ये तुम्ही सांगत आहे त्याप्रमाणे जर दुरुस्ती करणे आवश्यक असेल. आपण एम.जी.पी.च्या सल्ल्याने करु.

**श्री.नितीन बरडे :-** हे ड्रेनेजचही लक्षात घ्या साहेब. हा गावातला प्रश्न आहे. नागरीकांचे पाईप मागुन पुढे येऊ शकणार नाही.

**मा.आयुक्त :-** गाव भागात असलेल्या सर्व अडचणींचा आपण शांततेत मार्ग काढु. अशी परिस्थिती निर्माण होणार नाही या दृष्टीने आपण सोल्युशन काढु.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब, ड्रेनेजच्या ज्या चाऱ्या बुजल्या आपण. जेथे सुरुवात झाली होती एक महिन्यापुर्वी तेथील चाऱ्या केव्हा बुजणार आहे महानगरपालिका, जसे आपण महानगरपालिकेच्या इमारती जवळचे बुजले आपण काल.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** सुरु केल आहे आपण ते काम.

**श्री.प्रशांत नाईक :-** तेथे पहिली सुरुवात झाली की, तेथे फक्त समोरच्या वसिलाबाजी ने होईल. सर्वात पहिले सुरुवात कुठे झाली होती ड्रेनेजची.

**श्री.नितीन बरडे :-** शिवाजी नगरला.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** शिवाजी नगरला.

**श्री.प्रशांत नाईक :-** मग शिवाजी नगर पासुन सुरुवात होणार आहे की, फक्त अर्जंट अर्जंट ठिकाणी होणार.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** नाही, हे आपल्या डिपार्टमेंटने काम चालु केलेल आहे. आणि तेथे आपण रस्ते दुरुस्तीची वर्कऑर्डर दिलेली आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** आपण डिपार्टमेंटनेच करायच साहेब.मलनिस्सारणच्या चाऱ्या बुजण्याच काम आपल्या महानगरपालिकेच आहे.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** ज्या ठिकाणी रस्ते दुरुस्ती वर्कऑर्डर दिलेल्या आहेत ना. त्या ठिकाणी मक्तेदाराकडुन करुन घेत आहोत आपण काम.

**श्री.प्रशांत नाईक :-** अमृतच काम करुन घेत आहोत.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** अन्डरग्राऊंड ड्रेनेजच म्हणत आहे मी.

**श्री.प्रशांत नाईक :-** म्हणजे अमृतच काम संपल की, मलनिस्सारणच काम सुरु करणार आपण.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** अमृतच काम तर एजन्सी करणार, पाईप लाईन संबंधीत.

**श्री.प्रशांत नाईक :-** चाऱ्या बुजायला ५० लाख लागतात का फक्त खड्डे बुजायला.चाऱ्या बुजायला ५० लाख लागतात का ? चाऱ्या बुजायला ५० लाख लागतील एका प्रभागाला, तर कुठे जाईल हा बजेट. होईल का ते ५० लाखात सांगा मला.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** काही भागात होऊ शकेल.

**श्री.प्रशांत नाईक :-** काही भागात नाही संपुर्ण शहराच सांगत आहे मी. जस आमच्याकडे गावठान भाग आहे लहान भाग आहे, आमच्याकडे पुरेसे होऊन जाईल ५० लाख. पण काही काही ज्यांचे वार्ड मोठे आहे त्यांच कस काय होईल.

**शहर अभियंता, श्री.भोसले :-** आता अन्डरग्राऊंडच काम तर होऊ द्या. नंतर पाहु.

**मा.सभापती :-** प्रशांत भाऊ, आता खड्डे कितीही झाले तर ते आपल्याला रिपेअर करावेच लागणार आहे. कसे करायचे काय करायचे ?

**श्री.नितीन बरडे :-** आता सभापती आहे तुम्ही, पैसे आहे तुमच्याकडे.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभापती आहे तुम्ही.

**मा.सभापती :-** हे कराव लागणार आहे आपल्याला.

**श्री.प्रशांत नाईक :-** कराव लागणार आहे हे खरं आहे ना, पण अवध्या २४ तासात फक्त महापालिकेसमोरच झाल.

**मा.सभापती :-** कस आहे, प्रशांतभाऊ तुम्ही जो महापलिकेचा विषय म्हणता, ज्या रस्त्यावरती नागरीकांची जास्त रहदारी आहे. त्याला आपल्याला प्राधान्य द्याव लागणार आहे. एका ना.आज समजा ना तेथे काही दुर्घटना घडली. आपला महापालिकेचा उतार किती आहे. तेथे काही दुर्घटना घडली, तर उद्या परत म्हणतील, महापालिकेच्या समोरचच रिपेअर केल नाही, शहराच काय करणार ?

**श्री.नितीन बरडे :-** ही जबाबदारी तुमची आहे आता.तुम्ही बसले आहे आता खुर्चीवर.

**मा.सभापती :-** अस नाही ना, ते करावच लागणार आहे आपल्याला. असा नका करु .चला पुढचा विषय घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमृतच्या ड्रेनेज संदर्भात साहेबांना परवा फोन केला होता, आव्हाणे रोडला, आता जे पाईप टाकत आहे कॉंक्रीटचे बघा ते कश्या पध्दतीने तोडता आणि जोडत आहे. त्या पाईपांना तडे जाता तसेच जोडत आहे ते.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** काही ठिकाणी पाईप टाकतांना त्याचे सॅकेटस ब्रेक झालेले आहे. ते सॅकेटस आपण त्याला बदलायला सांगितल आहे.

**मा.आयुक्त :-** ब्रोकन पाईप असतील शेवटी काम करतांना हे आर.सी.सी.पाईप ना.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** हो आर.सी.सी. पाईप आहे.

**मा.आयुक्त :-** जे काही असे सिमेंटचे पाईप असतील त्यांना रिपेअर करा किंवा रिप्लेस करा. आपण जे योग्य असेल ते करु.

**प्रकल्प अभियंता, श्री. बोरोले :-** याच्या व्यतिरिक्त सर आपण त्याला सर्व जॉईंटसला कमप्लीट बॅडरींग करण्याची सुचना दिलेली आहे.

**मा.आयुक्त :-** एम.जी.पी.च्या याच्याने ती कुठेतरी मेन लाईन आहे. सगळयाकडचे सेवर लाईन त्याला येऊन जुडणार आहे. पुलाकडुन जाणारी नाल्याकडुन जाणारी ती मेन लाईन आहे. भविष्यामध्ये जे लाईन रोडसाईडला आल्या तेथे कॉलीटी कॉम्प्रोमाईज कुठेही होणार नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पाटील साहेब, तुम्ही ज्या आयुक्त साहेबांच्या बंगल्याच्या जवळ कॉबीन लावलेल आहे. त्यावेळेला कचरा जमा करायची गाडी तेथे दोन वेळा यायची आता एकच ट्रीप मारते ती. आणि बाकीच्या घंटागाडया ते दुसऱ्या वार्डात ते खाली करायला पाठविता, ५ लिटर डिझेल त्या घंटागाडीला पुरीन का साहेब ते ? येत नाही ती दुसरी ट्रीप करायला, १५ दिवस झाले तक्रार करत आहे मी. घंटागाडी माझ्या प्रभाग क्र.१ मध्ये १५ दिवसापासुन १-१ गाडी बंद आहे.

**मा.आयुक्त :-** नवनाथ भाऊ तुमची तक्रार त्यांच्यापर्यंत नाही का पोहचली ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सांगितल मी त्यांना.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** घंटागाडी बंदची जी तक्रार केली होती ना आपण, मक्तेदाराला आपण ते वेळोवेळी कळविल, आता त्याच्याकडच्या काही गाडया ज्या आहे नादुरुस्त आहे. त्यांच मोठ काम निघणार आहे. ते दुरुस्तीच काम चालु आहे. आणि घंटागाडी जर त्यांनी पुरविली नाही तर आपण त्याला आपल्या कायद्यानुसार दंड करत आहोत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ते दंड किती वेळा करणार, कचरा रोडावर येत आहे.

**मा.आयुक्त :-** दंड करणे हा आपला हेतु नाही. लोकांना सेवा देणे आपला हेतु आहे. म्हणजे थोडक्यात तो म्हणेल सगळया गाडया मी बदं करतो, आणि आपण त्याला दंड करतो, तर स्वच्छतेच काय करायच.

**श्री.नितीन बरडे :-** मजुर येत नाही त्याच काय आहे साहेब ?

**मा.आयुक्त :-** एक मिनीट, काय होत, हे आपल क्वीज कॅन्टेस्ट चालु झाला ना की, सगळा गोंधळ होऊन जातो. एक त्याच्यामध्ये हे करा, त्यांची तक्रार ही आहे की, आपल्या त्या ठिकाणी शिवाजी नगरला पाण्याच्या टाकीच्या आवारामध्ये, त्यांचे म्हणण आहे की, पुर्वी तो जो कॉम्पॅक्टर आहे. घंटागाडीचा कचरा रिसिव्ह करणारा तो दोन ट्रीप करत होता, आता दुसऱ्या ट्रीपला तो येत नाही, त्यामुळे दुसऱ्या ट्रीपच्या काही घंटागाडया तुम्ही दुसऱ्या कुठेतरी ट्रान्सपोर्टेशनला खाली करायला पाठविता, आणि पुर्ण घंटागाडया येत नाही तिथपर्यंत, अशी

परिस्थिती आहे का बघा. तस जर असेल तर त्याच नियोजन आपण केल पाहिजे. त्याचा प्लॅन तयार पाहिजे. प्रत्येक गाडीत किती कचरा निघाला, कुठे खाली होणार, कोणत्या डंपींग स्टेशनवर जाणार आहे. पहिल्या ट्रीपला कोणत, दुसऱ्या ट्रीपला कोणत, एवढ जर प्लॅनींग नाही झाल असेल तर नवनाथ भाऊ जे म्हणत आहे तो चिंतेचा विषय कायम आहे. म्हणजे तुमच कागदावर वेगळ आहे आणि फिल्डवर वेगळ करत आहात.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** नाही सर हे कॉम्पॅक्टरच पहिल्यांदा सांगितल त्यांनी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मागच्या मिटींगमध्ये पण मी तुमच्या अधिकाऱ्याला बोललो, तुमच्या कानावर आला नाही का विषय हा ?

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** तो विषय नाही आला,मला फक्त त्या घंटागाडयांचा विषय जो आहे तो आला त्या दिवशी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता फक्त तो १५ घंटागाडया खाली करतो तो कॉम्पॅक्टर, पहिले तो दोन वेळा यायचा

**मा.आयुक्त :-** चेअरमन साहेब, माझी या निमित्ताने सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे, आपल्या वार्डातल्या ज्या अडचणी आहे ना. विभाग प्रमुखांपर्यंत आपण थेट पोहचवा.खाली कोणाला तरी सांगता तुम्ही तिथल्या तिथे तो सोडविणे अपेक्षित आहे पण तो काम जर नाही झाल तर ऐन वेळेला, हा जसा आताच झाला कॉम्पॅक्टरचा विषय, त्यांना माहित नाही. अश्या मध्ये जर तुमची तक्रार थेट त्यांच्या पर्यंत गेली. ते त्यांच्याकडुन काम करुन घेतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** घंटागाडीची केलेली आहे.

**मा.आयुक्त :-** नाही, सगळयाच बाबींमध्ये मी म्हणतो, त्या त्या खातेप्रमुखापर्यंत आपली तक्रार पोहचवा. आम्ही त्याची दखल घेऊ.

**श्री.नितिन बरडे :-** सर तुमच्याकडुन,

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** आता घंटागाडया मधुन दोन नंबरच्या ऑर्डरवर फक्त एक गाडी बनली.

**श्री.नितीन बरडे :-** आज आणि कचऱ्याच्या गाडया, कचरा उचलण्यासाठी ज्या आपल्या पिकअप व्हॅन आहे मोठया,

**सौ.ज्योती चव्हाण :-** प्रभाग क्र.१३ मध्ये पण नाही सर, मी तुम्हाला फोन केला होता.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** घंटागाडया तर चालु आहे सर्व.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नाही, पिकअप व्हॅन.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** त्या आता बंद आहे सध्या.

**श्री.नितीन बरडे :-** त्या का बंद आहे ?

**मा.आयुक्त :-** रस्त्यावर जमा झालेला कचरा उचलला जातो का ?

**श्री.नितीन बरडे :-** नाही उचलला जात साहेब. मजुर येत नाही साहेब.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** एक व्हॅन दिली मी तुम्हाला.

**सौ.ज्योती चव्हाण :-** एक दिली पण ८-१० दिवसानंतर दिली ना साहेब.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** नाही ना मॅडम रेग्युलर झालेली आहे ती.

**सौ.ज्योती चव्हाण :-** एकच चक्कर होतो तिचा. दोन व्हायला पाहिजे ना तर एकच होतो.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** आता ते मक्तेदाराने केलेल नियोजन आहे.

**मा.आयुक्त :-** मक्तेदाराने केलेल नियोजन जर फेल झाल तर आपण काय करणार. एक करा, मक्तेदाराने केलेल नियोजन योग्य आहे की नाही हे बघण्याची जबाबदारी आपली आहे ना. नागरीकांना आणि नगरसेवकांना त्याच्यामध्ये काय अपेक्षा आहे की, त्याच्या वार्डामधील कचरा उचलला गेला पाहिजे. तुम्ही केलेल नियोजन तुम्ही घंटागाडीने द्या किंवा लोटगाडीने द्या याला महत्व नाही. मक्तेदारावर जबाबदारी ढकलुन आपल्याला आपली जबाबदारीतुन पळता येणार नाही लक्षात घ्या. प्रत्येक वेळा हेच उत्तर दिले जातात.मक्तेदाराची जबाबदारी आहे ही. तुम्ही हे तपासुन बघा. जर कचरा उचलला जात नसेल, जर समजा वाहन कमी पडत असेल, तुम्ही वाहने वाढविण्याच इस्टीमेट द्यायला पाहिजे. रोज कचरा जमा होणार आहे, रस्त्यावरच असेल, घंटागाडीच असेल किंवा डस्टबिन मधील असेल, ते रोज उचलण्याची व्यवस्था झाली पाहिजे. समजा वाहनांची काही मागणी असेल, वाहन वाढवली पाहिजे. तुम्ही सॅनिटरी इन्स्पेक्टर कडुन रिपोर्ट घ्या त्यांच्या वार्डाचा,

**सौ.ज्योती चव्हाण :-** मी लेखी पण दिलेल आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सर वाहन भरपुर आहे आपल्याकडे, आपले वाहने नविन ही होते. ते का बंद पडत आहे याच जरा तपास घ्या.

**मा.आयुक्त :-** नितीन भाऊ आता आपण आपली वाहने कॉन्ट्रॅक्टरकडे दिलेली आहे त्याच मेनटेनन्स त्यानी करायच आहे. आपली जबाबदारी ऐवढी आहे की, वार्ड मधला १००% उचलला जाईल अशी व्यवस्था वॉटरग्रेस कडुन तयार झाली पाहिजे. आपण जस म्हणत आहे तस हे म्हणत आहे. जर त्यांच्या वार्डमध्ये रोजचा कचरा उचलला जात नसेल तर एखाद्या वेळेस वाहन वाढवायची गरज असेल तर वाहन वाढवुन देऊ.

**श्री.नितीन बरडे :-** सर वाहने का बंद पडत आहे. आपली वाहने नविन होती का बंद पडत आहे याचा तपास घेतला आहे का ?

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब त्याच कारण शोधा.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब आमच्याकडे एवढे मटेरिअल आहे.

**मा.आयुक्त :-** प्रशांतभाऊ शोधा म्हणजे याचा अर्थ तुम्ही शोधल आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आम्ही शोधले आहे. साहेब आज तुम्हाला सांगुन देतो, आमच्यापशी ऐवढा मटेरिअल आहे वॉटरग्रेस आणि तुम्ही अधिकारी, तुमच्यावर डायरेक्ट गुन्हा होईल एवढ मटेरिअल आहे. गाडया का बंद होत आहे. ?

**श्री.प्रशांत नाईक :-** आपले वाहने त्यांच्या ताब्यात दिलेले आहे साहेब.

**मा.आयुक्त :-** मा.सभापती महोदय आणि सन्मा. सदस्य आपल्याला महानगरपालिकेचा हित लक्षात घेऊन आपल्याला सर्व करायच आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्याकडे खरोखर जर अस काही आहे ज्याच्याने महापालिकेच्या हिताच नुकसान होत असेल तर ते आपण कृपया द्यावे. आणि महानगरपालिका त्याची तपासणी करेल.एक मिनीट, अडचणी पेक्षा जर आपल महापालिकेच नुकसान होत असेल त्याला टाळण ही सगळयांची जबाबदारी आहे. माझी विनंती सगळे नगरसेवकांना सुध्दा हेच राहिल. कुठेही चुकीच काही घडत असेल, तर आपण ते निर्दशनास आणुन दिल पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** अडचणी एवढया आहेत की, आम्ही त्याच्यावर बोलणार नाही. पण यांनी लक्षात घ्यायला पाहिजे वाहने का बंद होत आहे. मजुर का येत नाही.

**मा.आयुक्त :-** कोणी अडचणीत येवो न येवो महापालिका अडचणीत येऊ नये एवढे बघणे आपली जबाबदारी आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अडचणी, चला खुप अडचणी येतील त्याच्यात.

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब आपल्या वाहनप्रमुखांना सांगितल आहे आम्ही, त्यांना विचारा काय अडचणी आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आम्ही तुम्हाला सुचित करुन देतो आहे. साहेबांना विचारुन घ्या मी सुचित केलेल आहे साहेबांना.

**श्री.प्रशांत नाईक :-** आम्ही आरोग्याधिकारीला पण सुचित केलेल आहे.

**मा.सभापती :-** सर्व विभागप्रमुख, आजच्या मिटींगमध्ये झालेल्या ज्या काही समस्या असतील नागरीकांच्या सदस्यांनी मांडलेल्या, पुढच्या मिटींग पर्यंत क्लियर व्हायला पाहिजे. आणि आपली आता ऑफलाईन सभा सुरु झालेली आहे तीन सभेपासुन, तर प्रत्येक विभाग प्रमुखाने सभेमध्ये हजर राहायला पाहिजे. त्यानंतर नागरीकांच्या ज्या सुचना आता सदस्यांनी मांडल्या, ते पुढच्या मिटींगपर्यंत मला वाटत क्लियर झाल्या पाहिजे. अमृतची असेल, अन्डरग्राऊंड ड्रेनेजची असेल किंवा कचऱ्याच्या संबंधात असेल. आपल्याला ही विनंती आहे की, काही असेल तसा तर आपण निर्दशनास आणाव. विभाग प्रमुखांच्या लक्षात आणुन द्याव. आणि त्यांनी त्याच्यावर अंमलबजावणी नाही केली तर आयुक्त साहेबांच्या लक्षात आणुन द्याव.

**श्री.प्रशांत नाईक :-** आम्ही त्यांच्याकडे तक्रार केलेली आहे आयुक्तांकडे ही केलली आहे.

**श्री.नितीन बरडे :-** तस संबंधीत अधिकाऱ्याला सुचित करुन दिलेल आहे.

**मा.आयुक्त :-**तुम्ही निर्दशनास आणुन दिलेल्या बाबींची दखल निश्चित घेऊ.

**मा.सभापती :-** तसेच सर्व विभाग प्रमुखांनी आपले जे डॉकेट आहे स्वत:हुन आपले प्रस्ताव नगरसचिवांकडे द्यायचे आहे. मला वाटत त्यांना फोन करुन प्रत्येक वेळेस प्रस्ताव मागवावे लागतात. तर ही आपल्यासाठी योग्य बाब नाही. आपण ते प्रस्ताव स्वत: त्यांच्याकडे द्यायला पाहिजे. वारंवार आपल्याला फोन करावे लागतात आणि मग आपण म्हणतो, आयत्यावेळेला हा विषय घ्या तो विषय घ्या. मुदत संपल्यानंतर काही विषय येतात. तर अशी दप्तर दिरंगाई होता कामा नये. ही सर्वांनी काळजी घ्यायची आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, मागच्या मिटींगमध्ये एक विषय होता योगिता बाविस्करचा परिचारिका,तर त्याबद्दल आपण बोललो होतो की, पुढच्या मिटींगला सांगतो, पगार वाढविण्याच्या संदर्भात. त्यांच अर्ज परत आमच्याकडे आलेला आहे, स्थायी समिती सभापतींकडे आलेल आहे.

**मा.आयुक्त :-** पुढच्या मिटींगला सांगतो अस नाही सांगितल होत. त्यांचा मुदतवाढीचा विषय होता, त्यावेळेला आपल्यापैकी काही सन्मा.सदस्यांनी त्यांना मानधन वाढवुन द्याव अश्या प्रकारचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळेला स्थायी समिती सभेमध्ये अशी चर्चा केली की, त्याला मुदतवाढ देऊ या आणि त्याला मानधन वाढविण्याच्या संदर्भामध्ये आपण नंतर निर्णय घेऊ.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो, त्याच निर्णयाबद्दल मा.सभापतींकडेपण त्यांचा अर्ज आला आहे आणि आमच्याकडे परत आला आहे तर ते काम काही पुढे सरकल का ?

**मा.आयुक्त :-** तो अर्ज माझ्याकडे पाठवुन द्या संबंधीत विभागाकडुन आपण त्यांचा रिपोर्ट मागवु. जर त्यांची मागणी योग्य असेल तर त्याप्रमाणे आपण प्रस्ताव ठेवु.

**डॉ.सोनल कुलकर्णी :-** कागदपत्रांची अपुर्णतता होती आणि शासकीय परिपत्रक जोडायचे होते आणि ते सगळी पुर्तता करुन काल उशिरापर्यंत साहेबांकडे पोहोचले त्यामुळे आयत्या वेळेस हा विषय घ्यायचा होता.

**मा.सभापती :-** मागच्या मिटींग मध्ये आपल्याला सांगीतले होते आज आठ दिवस झाले या आठ दिवसांत आपण पाठवायला पाहीजे होते.

**डॉ. सोनल कुलकर्णी :-** नाही सर आम्ही पाठवले होते पण पुर्ण कागदपत्रे आणि संपुर्ण परिपत्रक जोडावे अश्या काही सुचना होत्या तर त्या सुचनांचे निवारण करुन आज संध्याकाळ पर्यंत पाठवले जाणार आहे.

**मा.सभापती :-** पुढच्या सभेमध्ये सदर प्रस्ताव पाठवावा.

**डॉ. सोनल कुलकर्णी :-** हो सर

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** साफसफाई करणारे जे आहे आपले बाथरुम व संडास धुण पडत कर्मचाऱ्यांना ती जी लहान मशिन असते ती उपलब्ध करुन द्या.आणि रेल्वे स्टेशनला जी साफसफाईची मशिन आहे. तशी एक उपलब्ध करुन घ्या. पुष्कळ ते वास येतो आपल्या १७ मजली मध्ये. तशी एक लहान मशिन घेऊन द्या.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** आपण एक तस पत्र द्या होईल का बघतो मी.

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**